सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २७६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ५ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## भारताला इंधन पुरवठा सुरूच राहणार, पुतिन यांनी केले स्पष्ट

### पंतप्रधान मोदींचीही रशियासाठी मोठी घोषणा : आरोग्य आणि अन्न सुरक्षा क्षेत्रातील सहकार्याबाबत करारावर स्वाक्षरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नवी दिल्ली**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. गुरुवारी दिल्लीत आगमन झाल्यानंतर पंतप्रधान मोदींनी त्यांचे स्वागत केले. आज, ते २३ व्या भारत-रशिया शिखर परिषदेत पंतप्रधान मोदींसोबत व्यापार, संरक्षण आणि ऊर्जा क्षेत्रातील महत्त्वाच्या करारांवर चर्चा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यातील द्विपक्षीय चर्चेनंतर, दोन्ही बाजूंनी संयुक्त निवेदनात संबंध मजबूत करण्याचा आणि दहशतवादाविरुद्ध संयुक्तपणे लढण्याचा संकल्प व्यक्त केला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत आणि रशियामधील मैत्री ही ध्रुवताऱ्यासारखी आहे. गेल्या आठ दशकांत अनेक चढ-उतार पाहिले आहेत. मानवजातीने अनेक आव्हाने आणि संकटांना तोंड दिले आहे.

महत्त्वाच्या खनिजांबाबत सहकार्य खूप महत्वाचे आहे. भारत सुरुवातीपासूनच युक्रेन मुद्द्यावर शांततेच्या बाजूने आहे,असंही मोदी म्हणाले. यावेळी पीएम मोदी यांनी रशियन नागरिकांसाठी मोठी घोषणा केली. रशियन नागरिकांना मोफत ई-टूरिस्ट व्हिसा देणार असल्याची घोषणा मोदींनी केली. दहशतवाद हा मानवतेच्या मूल्यांवर हल्ला आहे आणि रशिया आणि भारत एकत्रितपणे त्याविरुद्ध लढतील, असंही मोदी म्हणाले.यावेळी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनीही इंधनाबाबत मोठी घोषणा केली. पुतिन म्हणाले की, रशिया कोणत्याही दबावाशिवाय भारताला इंधन पुरवठा करत राहील. रशिया आणि भारत यांच्यातील संबंधांच्या प्रत्येक पैलूवर चर्चा केली आहे. सुरक्षा, अर्थव्यवस्था, व्यापार आणि संस्कृती या क्षेत्रात आमचे संबंध सतत मजबूत करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत, असंही पुतिन म्हणाले.

पंतप्रधान मोदी म्हणाले, भारत-रशिया आर्थिक भागीदारीला नवीन उंचीवर नेणे हे आमचे प्राधान्य आहे. आम्ही २०३० पर्यंत भारत-रशिया आर्थिक सहकार्य कार्यक्रम सुरू ठेवण्यास सहमती दर्शविली आहे. भारत आणि रशिया युरेशियन आर्थिक संघासोबत मुक्त व्यापार करार (ऋढ-) लवकर पूर्ण करण्यासाठी काम करत आहेत.दोन्ही देशांनी स्थलांतर आणि हालचाली सुलभ करण्याबाबत करारावर स्वाक्षरी केली. यामुळे रोजगार किंवा व्यवसायासाठी एका देशातून दुसऱ्या देशात प्रवास करणे सोपे होईल.

## उच्च न्यायालयाच्या आदेशावर सर्वोच्च न्यायालयाची मोहोर; आता मतमोजणी २१ डिसेंबरलाच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**



राज्यातील नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांची मतदान प्रक्रिया सुरू असतानाच मतमोजणीला अनपेक्षित अडथळा आला असून, हा प्रश्न आता थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचला आहे. नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार मतमोजणी पुढे ढकलण्यात आली होती. या आदेशाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. मुख्य न्यायाधीश सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठापुढे प्रकरणी सुनावणी पार पडली. सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत मतमोजणी थेट २१ डिसेंबरलाच करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यामुळे मतदारांचे लक्ष आता आगामी मतमोजणीकडे लागले असून अनेक शहरांतील सत्तांतराविषयीची उत्सुकता वाढली आहे. न्यायालयाच्या या हस्तक्षेपामुळे निवडणूक प्रक्रियेतील अनिश्चितता काही काळ वाढल्याचे चित्र आहे. मात्र आता अंतिम मतमोजणी दिनांक निश्चित झाल्याने राजकीय वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणूक प्रक्रियेत महत्वाचा निर्णय घेण्यात आला असून, मतमोजणी आता २१ डिसेंबर रोजी होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २ डिसेंबर रोजी हा आदेश जारी केला होता. त्यावर आता सर्वोच्च न्यायालयानेही शिक्कामोर्तब केले आहे. २६४ नगरपालिका व नगरपंचायतींसाठी २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले होते आणि ३ डिसेंबरला मतमोजणी होणार होती. मात्र, निवडणूक कार्यक्रमात केलेल्या बदलामुळे परिस्थिती बदलली. आता उर्वरित २४ नगरपालिका व नगरपंचायतींमध्ये आणि ७६ नगरपालिका व नगरपंचायतींतील १५४ सदस्यपदांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार असल्याने, सर्वच निवडणुकांची मतमोजणी एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबर रोजी करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

न्यायालयाने मतदानानंतर होणाऱ्या मतदानोत्तर चाचण्यांचे निकालही २० डिसेंबर रोजी मतदान संपल्यानंतर पुढील अर्धा तास होईपर्यंत जाहीर करता येऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्यामुळे मतमोजणीसाठी आणखी काही दिवसांची प्रतीक्षा वाढली असली, तरी सर्व निकाल एकाच दिवशी जाहीर होणार असल्याने राजकीय क्षितिजावर उत्सुकता अधिक वाढली आहे. राज्यातील स्थानिक सत्तेचे चित्र कोणत्या दिशेने बदलते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महापालिका निवडणुकांचा बिगुल डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात! राज्यातील मनपा आयुक्तांनी दर्शविली तयारी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

राज्यातील महापालिकांची निवडणूक डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. राज्य निवडणूक आयोगाने गुरुवारी राज्यातील सर्व महापालिका आयुक्तांची ऑनलाइन बैठक घेतली. त्यात निवडणुकीसाठीची आमची तयारी असल्याचे बहुतेक आयुक्तांनी सांगितल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे आणि सचिव सुरेश काकाणी यांनी या बैठकीत मतदार याद्या अंतिमरीत्या प्रसिद्ध करण्याबाबत आयुक्तांना विचारणा केली. आयोगाने या याद्या १० डिसेंबरला प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, त्यासाठी आणखी दोन-तीन दिवस लागू शकतात, असे काही आयुक्तांनी सांगितले.

तसा अवधी देण्याची तयारी आयोगाने दर्शविली. आता आयोग ८ डिसेंबरला पुन्हा आयुक्तांची बैठक घेऊन निवडणुकीसंदर्भातील पूर्वतयारीचा (जसे कर्मचारी व इतर व्यवस्था) आढावा घेईल. साधारणत: डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात महापालिका निवडणूक जाहीर होण्याची शक्यता असल्याचेही सूत्रांनी सांगितले.

**प्रभागनिहाय मतदार याद्या अचूक करा**

महापालिका निवडणुकांच्या मतदार याद्यांमधील संभाव्य दुबार मतदारांचा काटेकोर शोध घेऊन प्रत्यक्ष मतदानाच्या वेळीदेखील दक्षता घ्यावी. प्रारूप मतदार याद्यांवरील प्राप्त हरकती आणि सूचनांची पडताळणी करून वेळेवर निपटारा करावा. याशिवाय प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना झालेल्या चुका निर्दशनास आल्यास तक्रारींची वाट न पाहता स्वत:हून दुरुस्तीबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश वाघमारे यांनी आयुक्तांना दिले.

दुबार मतदारांची यादी संबंधित महापालिकेने आपल्या सूचना फलकावर आणि संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी. त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाने २९ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करावी. मतदार यादीतील संभाव्य दुबार मतदाराच्या नावासमोर दोन स्टार (**) दर्शविण्यात आलेले आहेत. असा मतदार कुठल्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत आवाहन करण्यात यावे.

आवाहनाला प्रतिसाद मिळाल्यानंतर त्या मतदारांकडून तो कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करणार आहे, याबाबत विहित नमुन्यात अर्ज भरून घ्यावा. अशा मतदाराने नमूद केलेले मतदान केंद्र वगळता त्यास उर्वरित कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान करता येणार नाही, असे वाघमारे यांनी स्पष्ट केले.

संभाव्य दुबार नाव असलेल्या मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास तो मतदार मतदान केंद्रावर मतदानासाठी आल्यास त्याच्याकडून त्याने इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत किंवा करणार नसल्याचे विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल.

## यापुढे कर्जमाफीत रकमेची मर्यादा नाही २५ लाख शेतकऱ्यांना होणार फायदा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी एक मोठी आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. 'यंदाच्या कर्जमाफी योजनेत रकमेची कुठलीही मर्यादा ठेवली जाणार नाही', अशी महत्वाची माहिती मिळत आहे. पूर्वीच्या कर्जमाफी योजनांमध्ये दीड ते दोन लाखांपर्यंतची मर्यादा असल्याने अनेक शेतकरी या लाभापासून वंचित राहिले होते. मात्र, आता या नवीन निर्णयामुळे थकबाकीदार शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आता कर्जमाफीच्या योजनेत शेतकऱ्यांना रकमेची मर्यादा नाही तर सातबाराच कोरा होणार आहे. राज्यातील सुमारे २५ लाख शेतकऱ्यांना थेट फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर स्थापन करण्यात आलेली समिती एप्रिल महिन्यामध्ये आपला अहवाल सादर करेल. त्याचसोबत, सरकारनं ३० जूनपूर्वी कर्जमाफीचं आश्वासन दिलं आहे ज्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.राज्यातील शेतकऱ्यांना सरकारने २०१७ मध्ये दीड लाखांची आणि २०१९ मध्ये २ लाखांची कर्जमाफी दिली होती. रकमेच्या मर्यादेत कर्जमाफी दिल्याने अनेक शेतकरी त्या योजनांचा लाभ घेऊ शकले नाहीत. पण सध्याच्या स्थितीत राज्यातील २४ लाख ७३ हजार शेतकरी थकबाकीत आहेत. त्यांच्याकडे बँकांची जवळपास ३५,४७७ कोटींची थकबाकी आहे. या पार्श्वभूमीवर आता थकबाकीदार शेतकऱ्यांसाठी सरकारने मोठा निर्णय घेतला. या थकबाकीदार शेतकऱ्यांचा सातबारा उताराच कोरा केला जाणार आहे.राज्यचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, 'राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी मिळणारआहे. सहकार खात्यामार्फत जिल्हानिहाय माहिती मागवण्यात आली आहे. प्रविणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नेमली आहे.

## हप्त्यांचे ओझे कमी होणार; आरबीआय कडून रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉइंट्सची कपात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**



रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने शुक्रवारी पतधोरण समितीच्या बैठकीत रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉइंट्सने कपात करत तो ५.२५ टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या तीन दिवसांच्या बैठकीनंतर नवा रेपो रेट जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे रेपो रेट ५.५० टक्क्यांवरून ५.२५ टक्क्यांवर आला आहे. जो गेल्या काही वर्षांतील सर्वात कमी आहे. यातून रिझर्व्ह बँकेच्या अनुकूल भूमिकेचे संकेत मिळतात.

**रेपो रेट म्हणजे काय?**

जेव्हा जेव्हा आरबीआय रेपो रेट कमी करते, तेव्हा कर्जाचे हप्ते घटतात. रेपो रेट म्हणजे असा व्याजदर ज्यावर बँका आरबीआयकडून कर्ज घेतात. स्वत:साठी कर्ज स्वस्त झाल्यास बँका हा लाभ ग्राहकांपर्यंतही पोहोचवतात. आता रेपो रेटमध्ये कपात झाल्याने, गृहनिर्माण आणि वाहन कर्जांसह किरकोळ कर्जांवरील व्याजदर कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे रेपो रेट कमी झाल्यास बँकांना लिक्विडिटी वाढवण्यासाठी एफडीमध्ये आकर्षक बदल करण्याची गरज भासत नाही.

रेपो रेटमध्ये २५ बेसिस पॉइंट्स कपात झाल्यामुळे गृहकर्जाचे व्याजदरही कमी होण्याची शक्यता आहे. अनेक बँकांनी त्यांच्या बेंचमार्क-लिंक्ड कर्ज दरांमध्ये कपात करण्याची घोषणा आधीच केली आहे. याचा अर्थ असा की नवीन कर्जदार आणि फ्लोटिंग रेट गृहकर्ज असलेले कर्जदार अशा दोन्ही प्रकारच्या कर्जदारांना रेपो रेट कपातीचा फायदा होईल.

## महायुतीतील वाद मिटवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे,भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण एकत्रित करणार चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ सिंधुदुर्ग**

नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदेसेना आणि भाजपा यांच्यातील वाद चव्हाट्यावर आले होते. त्यात शिंदेसेनेचे अनेक पदाधिकारी भाजपात घेतले जात असल्याने रवींद्र चव्हाण यांच्यावर शिंदेसेनेने आगपाखड केली होती. मात्र आता महायुतीतील वाद मिटवण्यासाठी लवकरच देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण एकत्रित चर्चा करणार आहेत. एकनाथ शिंदे यांनी चव्हाणांशी संपर्क साधून वादावर पडदा टाकला पाहिजे असं म्हटलं आहे. सिंधुदुर्गात घेतलेल्या पत्रकार परिषदेत रवींद्र चव्हाण यांनी महायुतीतील वादावर भाष्य केले.

रवींद्र चव्हाण म्हणाले की,





महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू होत्या. त्यापैकी काही निवडणुका पूर्ण झाल्यात. काही ठिकाणी अजूनही निवडणुका बाकी आहे. निवडणूक प्रचारात अनेक आरोप प्रत्यारोप होत असतात. ते होणं स्वाभाविक असते. भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी आम्ही महायुतीत एकत्रपणे सत्तेत गेली वर्षभरापासून चांगली कामे करतोय. त्यामुळे येणाऱ्या काळात केंद्र आणि राज्यातील सरकार सुरळीतपणे चालले पाहिजे ही भावना महाराष्ट्रातील जनतेची आहे. हीच भावना भाजपाचीही आहे. पण काही दिवसांआधी असे घटनाक्रम होत राहिले. त्यातून काही ना काही विषय पुढे जात राहिले असं त्यांनी सांगितले.

तसेच महायुतीतील नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी कालच चर्चा झाली. त्यावेळी त्यांनी विषय अधिक वाढवू नये असं सांगितले. त्यावर काय करावे असं मी विचारले. त्यामुळे लवकरच आम्ही सर्व जण देवेंद्र फडणवीस, मी आणि ते एकत्रित बसणार आहोत. जे घडलंय त्यावर आपण पडदा टाकला पाहिजे असं शिंदेंनी म्हटलं. त्यामुळे कल्याण डोंबिवली हा जो अतिशय संवेदनशील भाग आहे. त्या भागात काही पक्षप्रवेश झाले. शिवसेनेत काही प्रवेश घेतले, त्यानंतर भाजपानेही प्रवेश घेतले. युवा नेते अभिजीत थरवळ यांच्या पक्षप्रवेशानंतर अधिक तीव्रता जाणवली. कल्याण डोंबिवली, उल्हासनगर येथे जे पक्षप्रवेश झाले त्यात दोन्ही बाजूने आक्षेप घेण्यात आले. त्यावर वरिष्ठ मंडळी सर्वजण एकत्र बसण्याचं ठरवलेले आहे. त्यावर १०० टक्के चर्चा होईल अशी माहिती रवींद्र चव्हाण यांनी दिली.

## ८ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशन, शनिवार-रविवारीही कामकाज राहणार सुरू; नागपुरात धडकणार ३३ मोर्चे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नागपूर**



महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरपासून सुरुवात होणार आहे. ८ डिसेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत नागपूरमध्ये हे अधिवशेन होणार आहे. महत्वाचे म्हणजे शनिवार आणि रविवार या शासकीय सुट्टीच्या दिवशी देखील दोन्ही सभागृहाचे कामकाज होणार आहे. हा निर्णय विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेतला. हिवाळी अधिवेशनासाठी नागपुरातील मुख्यमंत्री निवासस्थानापासून विधिमंडळ परिसर असलेल्या सिव्हिल लाईन्स भागात पोलिस छावणीचे स्वरूप आले आहे.

हिवाळी अधिवेशन बंदोबस्तासाठी शहर आणि बाहेर जिल्ह्यातील ७ हजार पोलिस सुरक्षेसाठी तैनात करण्यात आले आहेत. आधुनिक सुविधा असलेली ५ सुसज्ज दक्षता वाहने, गृहरक्षक दल, बॉम्ब शोधक, नाशक पथकासह विशेष कमांडो सुरक्षेसाठी तैनात करण्यात आली आहेत. मंत्री आणि नेत्यांच्या बंदोबस्तासाठी राज्यभरातून पोलिस फौजफाटा नागपुरात येण्यास सुरुवात झाली आहे. अधिवेशनात मोठ्या प्रमाणात मोर्चे काढले जातात त्यासाठी पोलिस बंदोबस्त असणार आहे.

यंदा अधिवेशनाचा कालावधी ८ दिवसांचा असले तरीही राज्यभरातील विविध जिल्ह्यातील ३ हजारांहून अधिक पोलिस बंदोबस्तासाठी तैनात केले जाणार आहेत. यामध्ये उपायुक्त स्तरावरील १० अधिकारी , सहाय्यक उपायुक्त ३४ अधिकारी, पोलिस निरीक्षक आणि उपनिरीक्षक २०० अधिकारी, २१०० पोलिस अंमलदार टप्प्याटप्प्याने शहरात दाखल होत आहेत. यंदाचे हिवाळी अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे. कारण विरोधक वेगवेगळ्या मुद्द्यावरून विरोधक सरकारला घेरण्याच्या तयारीत आहे.

८ डिसेंबरपासून नागपुरमध्ये होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात ३३ मोर्चे धडकरणार आहेत. २२ संघटनांनी धरणे आंदोलन तर १७ संघटनांनी साखळी उपोषणाला परवानगी मागितली. अधिवेशनाच्या एक दिवस आधी दिंडोरा बॅरेज प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा संघर्ष समितीने मोर्चा काढण्याची परवानगी मागितली. एकाने आत्मदहनाची परवानगी मागितली आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी ५ मोर्चे विधानभवनावर धडकणार आहेत. आणखी मोर्च्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

## भाजपापाठोपाठ उद्धव ठाकरेंचाही शिंदेसेनेला दणका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५मुंबई**

मागील २ दिवसांपासून राज्यात बऱ्याच घडामोडी घडत आहेत. कल्याण डोंबिवलीतील पक्षप्रवेशावरून भाजपा आणि शिंदेसेनेत संघर्ष शिगेला पोहचला आहे. याठिकाणी भाजपाने शिंदेसेनेचे पदाधिकारी फोडले. त्यानंतर संतापलेल्या शिंदेसेनेने थेट भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यावर हल्लाबोल केला आहे. यातच उद्धव ठाकरे यांच्याकडूनही एकनाथ शिंदे यांना घेरण्याची तयारी सुरू झाली आहे. शिंदेंचा गड मानला जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यात उद्धव ठाकरेंनीएकनाथ शिंदे यांना धक्का दिला आहे. शिंदेसेनेचे प्रमुख पदाधिकारी पुन्हा उद्धवसेनेत परतले आहेत.

ठाण्यातील शिंदेसेनेचे उपविभागप्रमुख रामचंद्र पिंगुळकर ह्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह उद्धवसेनेत प्रवेश केला आहे. इतकेच नव्हे तर एकनाथ शिंदे यांचा मतदारसंघ कोपरी पाचपाखाडीमधील उपविभागप्रमुख आबा मोरे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह मातोश्रीवर उद्धवसेनेत प्रवेश केला त्याशिवाय नवी मुंबईतील शिंदेसेनेचे सहसंपर्कप्रमुख शिरीष काशिनाथ पाटील, उपविभागप्रमुख मयूर ठाकूर आणि संदिप साळवे यांनीही कार्यकर्त्यांसह उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत पक्षप्रवेश केला आहे. एकनाथ शिंदे यांनी ३ वर्षापूर्वी उद्धव ठाकरेंशी फारकत घेतली त्यानंतर ४० आमदारांसह अनेक पदाधिकारी शिंदेंसोबत गेले. मागील अडीच ते तीन वर्ष सातत्याने एकनाथ शिंदे यांच्याकडे इनकमिंग सुरू आहे. मात्र महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिंदेसेनेला धक्का देण्याचं काम उद्धव ठाकरे यांनी केले आहे.

नगरपरिषद, नगरपालिका निवडणुकांमध्ये महायुतीतील सत्ताधारी शिंदेसेना आणि भाजपा बऱ्याच ठिकाणी आमनेसामने आल्याचे चित्र आहे. त्यात सिंधुदुर्ग नगरपालिका निवडणुकीत शिंदेसेनेचे आमदार निलेश राणे यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना टार्गेट करून भाजपा पैसे वाटप करत असल्याचे स्टिंग ऑपरेशन केले. त्यानंतर मालवणमध्ये ऐन मतदानाच्या आदल्या रात्री अज्ञात वाहनातून भाजपा पदाधिकारी पैसे वाटत असल्याचे पकडल्यानंतर निलेश राणे यांनी मध्यरात्री पोलीस स्टेशन गाठले. कल्याण डोंबिवलीतही शिंदेसेनेचे अनेक पदाधिकारी भाजपात घेण्याचं काम सुरू आहे.

## संपादकीय ......

# सायबर चोरांच्या मुसक्या आवळा!

भारत जगभरात 'आयटी हब' म्हणून ओळखला जातो. डिजिटल क्रांतीमुळे माणसाचे राहणीमान आणि जीवनशैली बदलली हे खरेच. बरीचशी कामे ऑनलाईन होऊ लागल्याने त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. देशात आज ९७ कोटींपेक्षा जास्त इंटरनेट कनेक्शन आहेत. कानाकोपर्यात ४२ लाख किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे ऑप्टिकल फायबर केबलचे जाळे विस्तारले आहे. 'फाइव्ह-जी'ची व्याप्ती जगात सर्वाधिक वेगाने वाढत आहे; मात्र तंत्रज्ञान दुहेरी असते. त्याचा गैरवापरही होत असतो, त्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. देशभरात वाढत असलेल्या डिजिटल अरेस्ट (आभासी अटक) आणि सायबर फसवणूक प्रकरणांमुळे चिंता निर्माण व्हावी अशी आजची स्थिती आहे. त्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने सर्व डिजिटल अरेस्ट प्रकरणांचा तपास सीबीआयकडे सोपवला.

आजकाल बहुतांश राज्यांमध्ये वरिष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात सायबर गुन्ह्यांचे बळी ठरत आहेत. डिजिटल अरेस्ट इन्व्हेस्टमेंट स्कॅम, पार्टटाईम जॉब स्कॅम हे प्रकार गंभीर सायबर क्राईमच्या अंतर्गत असल्याचे न्यायालयाने म्हटले. ज्या राज्यांनी सीबीआय चौकशीस मान्यता दिली नव्हती त्यांनाही अशा तपासास सहमती देण्याचे आदेश दिले. बरेच गुन्हे देशाबाहेरूनही घडत असल्यामुळे सीबीआयने इंटरपोलची मदत घ्यावी, अशी सूचनाही केली. सिम कार्ड जारी करताना निष्काळजीपणा झाला असेल, तर यावर उपाययोजना करणारा प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आले. भविष्यात सिमचा दुरुपयोग टाळण्यासाठी सर्व दूरसंचार कंपन्यांना कठोर प्रणाली लागू करावी लागेल; मात्र सीबीआयला तपास करण्यासाठी काही अधिकारही द्यावे लागतील. सर्वोच्च न्यायालयाने बँक खाते उघडण्यास सामील बँक अधिकार्यांची भूमिका तपासण्याचे अधिकारही सीबीआयला दिले. त्याचप्रमाणे ज्या खात्यांचा वापर डिजिटल अरेस्टसाठी झाला, त्याचीही सखोल चौकशी करता येईल.

हे सर्व व्यवहार बँकेमार्फत होत असतात. रिझर्व्ह बँकेचे देशातील बँकांवर नियंत्रण असते. त्यामुळे आर्टिफिशियल इंटेलिजन्स/ मशिन लर्निंग प्रणाली लागू करून संशयास्पद खात्यांची ओळख पटवा आणि गुन्ह्यातील रकमेचा प्रवाह थांबवा, अशा सूचना न्यायालयाने रिझर्व्ह बँकेला दिल्या. डिजिटल अरेस्ट, ऑनलाईन फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांची वाढती संख्या या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय दूरदृष्टीचा आहे. देशभरातील सर्व तपास यंत्रणासाठी तो मार्गदर्शक ठरणारा आहे. या सायबर गुन्हेगारांनी अक्षरश: धुमाकूळ घातल्यासारखी स्थिती आज आहे. आज देशात दररोज एक व्यक्ती डिजिटल अटकेतून आर्थिक फसवणुकीला बळी पडत आहे. देशभरातील अशा फसवणुकीचा आकडा १००० कोटींवर गेला असल्याची मिळणारी माहिती धक्कादायक आहे. यात सर्वच स्तरातील नागरिक बळी पडत असून आयुष्यभर पै- पै करून साठवलेला पैसा अशा गुन्हेगारांच्या घशात घालायची वेळ त्यांच्यावर आली आहे. महाराष्ट्रातील या गुन्ह्यांचे प्रमाणही चिंताजनक म्हणावे असे आहे.

२०२५ या वर्षात जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांच्या काळात महाराष्ट्रात डिजिटल अरेस्टची २१८ प्रकरणे घडली आणि यातून ११२ कोटी रुपयांची फसवणूक झाली. मुंबईतील एका ७२ वर्षीय उद्योगपतीची, तर ४० दिवसांत एकूण ५८ कोटी रुपयांची फसवणूक केली गेली. शेजारच्या कर्नाटकात २०२४ या वर्षात ६४१ डिजिटल अरेस्ट प्रकरणांत १०९ कोटींची फसवणूक झाली. यातील केवळ ९ कोटी परत वसूल केले गेले. कर्नाटकात अशा फसवणुकीची संख्या जास्त आहे, तर मध्य प्रदेशात २६ प्रकरणांत १२.६० कोटी रुपयांचा गंडा घातला गेला. फसवणुकीचे हे आकडे थक्क व्हायला लावणारे आहेतच, शिवाय या गुन्ह्यांची उकल होत नाही, दोषी सापडत नाहीत, त्यांच्या मुसक्या आवळण्यात पोलिस यंत्रणांना अपयश येते, हे त्याहून अधिक गंभीर. देशातील सर्व केंद्रीय तपास यंत्रणांनी 'डिजिटल अटक' हा प्रकारच अस्तित्वात नाही, असे स्पष्टीकरण देऊनदेखील आजही या नावे सायबर फसवणूक होते. खरे तर देशातीलच नव्हे, तर जगातील कोणतीही तपास यंत्रणा डिजिटल अरेस्ट या पद्धतीचा वापरच करत नाही.

तुमच्या फोनवर व्हिडीओ कॉल करून सीबीआय, ईडी, एनआयए, इन्कमटॅक्स, डीआरआय (महसूल गुप्तचर संचालनालय) कस्टम्स, एनसीबी (अमली पदार्थ प्रतिबंधक विभाग) आदी विविध स्वरूपाच्या तपास यंत्रणांकडून 'मी बोलतोय' असे सांगितले जाते. विश्वास बसावा यासाठी संबंधित यंत्रणेचा लोगो वा प्रसंगी छायाचित्रांचा वापर केला जातो. समोरच्या व्यक्तीला तुमचे नावही माहिती असते. तुम्ही घोटाळा केला आहे, करचोरी केली आहे, तुमचे एक पार्सल आले आहे व त्यात अमली पदार्थ आहेत, बँक खाते काळा पैसा प्रतिबंधक कायद्यांतर्गत चौकशीसाठी सील केले आहे, असे खोटेच सांगितले जाते. वेगवेगळी माहिती घेऊन, बनावट ओळखपत्र तसेच गणवेश धारण करून घाबरवले जाते. 'तुम्हाला डिजिटल स्वरूपात अटक केली आहे' वा 'तुम्हाला सर्वेक्षणाखाली ठेवले आहे', असे सांगितले जाते. तुम्हाला तत्काळ व्हिडीओ कॉल करण्यास सांगितले जाते. व्हिडीओवर समन्स दाखवले जाते.

जामीन हवा असल्यास पैशाची मागणी केली जाते. एकदा तुम्ही पैसे दिले की, कॉल रद्द होतो. काही वेळा वारंवार फोन करून त्रास दिला जातो. खरे तर, डिजिटल अटक टाळण्यासाठी अनोळखी कॉल किंवा मेसेजकडे लक्ष देता कामा नये. ओटीपी, बँक खाते क्रमांक, पासवर्ड किंवा इतर कोणतीही संवेदनशील माहिती कोणालाही देऊ नये. कोणत्याही अनोळखी किंवा संशयास्पद लिंकवर क्लिक करू नये. त्याद्वारे तुमची वैयक्तिक माहिती चोरली जाऊ शकते. तुम्ही घोटाळ्याचे बळी ठरला असाल, तर तत्काळ सायबर क्राईम हेल्पलाईनवर किंवा राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलवर तक्रार नोंदवून बँकेलाही तत्काळ सूचित केले पाहिजे. सीबीआयकडे तपास आल्यामुळे एकत्रित तपास होऊन या गुन्हेगारांना आळा बसेल, अशी अपेक्षा आहे; मात्र सामान्य लोकांनीदेखील आर्थिक व्यवहारात सतत सावधगिरी बाळगली पाहिजे.

# आता घ्यायची तर १०० टक्के इथेनॉलवर चालणारीच कार घ्या

## गडकरी बसले, म्हणाले '२५ रुपये लीटर...'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नवी दिल्ली-** केंद्रिय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज देशातील इंधनाच्या भविष्याची झलक दाखवली. ते दिल्लीमध्ये १०० टक्के बायो-इथेनॉलवर चालणाऱ्या 'फ्लेक्स-फ्युएल' टोयोटा इनोव्हा कारमधून प्रवास करताना दिसले. प्रदूषण कमी करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व संपवणे, हेच भारताचे भविष्य आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.




इथेनॉलच्या वापराने किती मोठा आर्थिक फायदा होऊ शकतो, हे देखील गडकरी यांनी यावेळी हिशेब मांडत सांगितले. सध्या बाजारात इथेनॉलची किंमत अंदाजे ६५ प्रति लीटर आहे, तर पेट्रोलची किंमत सुमारे १२० प्रति लीटर आहे. प्रवास करताना ही कार ६० टक्क्यांपर्यंत वीजही निर्माण करते. त्यामुळे या वाहनाने प्रवास करण्याचा प्रभावी खर्च सुमारे २५ प्रति लीटर इतका कमी होतो, असा दावा गडकरी यांनी केला आहे.

जेव्हा इंधन इतके स्वस्त होईल, तेव्हाच लोक मोठ्या संख्येने इथेनॉलचा स्वीकार करतील. इथेनॉल थेट शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे, कारण ते कृषी उत्पादने आणि त्यांच्या उप-उत्पादनांमधून (उदा. तांदूळ, मका, उसाचा रस, शेतीतला कचरा) तयार केले जाते. यामुळे प्रदूषण होत नाही आणि हे 'ग्रीन फ्युएल' असल्याने शेतकऱ्यांचा मोठा फायदा होईल, असेही गडकरी म्हणाले.

**सध्याची स्थिती**

सध्या देशात सुमारे ५५० इथेनॉल प्लांट कार्यरत आहेत आणि पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रण करण्याची योजना आधीच लागू झाली आहे. या ई २० वरून आधीच वाहन मालक त्रस्त झालेले आहेत. परंतू, त्यांचा आवाज ऐकला जात नाहीय. सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर केंद्र सरकार आणि गडकरींवर टीका झाली होती. वाहनाचा मेन्टेनन्स वाढला आहे, इंधनाच्या टाकीत इथेनॉलमुळे पाणी तयार होण्याचा धोका वाढलेला आहे. तसेच वाहन मायलेजही कमी देत आहे. अशाप्रकारे तिहेरी हल्ला वाहन मालकांवर झालेला आहे.

# थंडीत पाय पांढरेफटक दिसतात? घरच्याघरी करा 'हा' उपाय, पाय होतील स्वच्छ मऊ; भेगाही दुखणार नाहीत

**दि.५ विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळा सुरू झाला की त्वचेची खूप जास्त काळजी घ्यावी लागते. आता या दिवसांत त्वचा छान मॉईश्चराईज राहावी म्हणून आपण आंघोळ झाल्यावर किंवा रात्री झोपण्यापुर्वी त्वचेला वेगवेगळे क्रिम लावतो, तेल लावतो. पण हे सगळं करत असताना पायाकडे मात्र दुर्लक्ष होतं. त्यामुळे मग या दिवसांत पाय खूप खराब होतात. तळपाय कोरडे पडून त्यांना भेगा पडतात. तर पायाचा वरचा भाग कोरडा पडून काळवंडून जातो म्हणूनच






पाय स्वच्छ करण्यासाठी पुढे सांगितलेले काही उपाय करून पाहा.

घरच्याघरी पेडिक्युअर कसं करावं?

१. पेडिक्युअरची सगळ्यात पहिली स्टेप करण्यासाठी एका मोठ्या टबमध्ये गरम पाणी घ्या. त्या पाण्यामध्ये थोडंसं मीठ, एखादा चमचा शाम्पू आणि १ चमचा खोबरेल तेल घाला. आता १० मिनिटांसाठी या पाण्यामध्ये पाय बुडवून बसा. पायांना तर बरं वाटेलच पण गरम पाण्यात पाय बुडवल्यामुळे स्ट्रेसही कमी झाल्यासारखा वाटेल.

२. आता दुसरी स्टेप करण्यासाठी तुमच्या घरात असलेलं कोणतंही टुथपेस्ट घ्या. टुथपेस्ट वापरून आपण पायाचे नख स्वच्छ करून घेणार आहोत. यासाठी टुथपेस्ट नखांना लावून घ्या. लिंबू मधोमध कापा आणि त्यावर बेकिंग सोडा टाकून त्याने नखं घासा. यामुळे नखांवरचा काळेपणा कमी होऊन नखं स्वच्छ होतील.

३. पायांचा काळवंडलेपणा कमी करून पाय स्वच्छ करण्यासाठी आता पायांना स्क्रबिंग करा. यासाठी एका वाटीमध्ये १ चमचा कॉफी पावडर, १ चमचा साखर, १ चमचा भाजलेली हळद आणि १ चमचा बेकिंग सोडा घ्या.थोडंसं गुलाब पाणी आणि खोबरेल तेल टाकून सगळे पदार्थ कालवून घ्या आणि या मिश्रणाने पायाला मालिश करा. पायांवरची डेडस्किन, टॅनिंग निघून पाय एकदम स्वच्छ होतील.

४. यानंतर पेट्रोलियम जेली आणि खोबरेल तेल एकत्र करून पायाला मसाज करा. पाय खूप स्वच्छ, मऊ झाल्यासारखे दिसतील. तळपायाच्या भेगाही कमी होतील

# सातबारा एडिट करून ज्वारी खरेदी करणाऱ्या संस्थांना दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अकोला,** सातबा-याच्या दस्तऐवजात ज्वारीच्या पे-याचा उल्लेख नसतानाही तो एडिट करून ते कागद ज्वारी खरेदीसाठी सादर करणा-या संस्थांना दंड ठोठावण्यात आला. त्याचप्रमाणे, जास्तीत जास्त गैरप्रकार केल्याचे आढळून आलेल्या संस्थेला काळ्या यादीत टाकण्याची शिक्षा देण्यात आली.




ज्वारी खरेदी प्रकरणात एकच संस्था काळ्या यादीत टाकून इतरांना सौम्य शिक्षा देण्यात आल्याची विपर्यस्त व चुकीची माहिती असलेली बातमी माध्यमात प्रसिद्ध झाली. त्याचा खुलासा जिल्हा विपणन अधिकारी बी. वाय. शेख यांनी केला आहे.

तहसीलदारांनी खरेदी केंद्रांची विस्तृत तपासणी करुन सादर केलेल्या अहवालाचे अवलोकन जिल्हा समन्वय समितीने केले. जिल्ह्यामध्ये १९३ सातबारावर पीकपेरा नसतानाही ज्वारी खरेदी झाल्याची बाब निर्दशनास आली. त्यामध्ये मुंडगाव येथील नरसिंग महाराज फार्मर प्रो. कंपनी या संस्थेने एडिट केलेले सर्वाधिक ६९ सातबा-यावर ज्वारी खरेदी केली आहे. या संस्थेने शासनाच्या ऑनलाईन पोर्टलवर शासकीय नियमांचा भंग करून संस्थेच्या पदाधिकारी व त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने ज्वारी खरेदी केली. ही अनियमितता हेतुपुरस्सर व गंभीर स्वरुपाची आहे. त्यामुळे त्यांना काळ्या यादीत टाकण्याचे व ज्वारीचे कमिशन देऊ नये, निर्देश जिल्हा समन्वय समितीने दिले.

त्याचप्रमाणे, तेल्हारा येथील वक्रतुंड शे. उ. कंपनी, अकोला तालुका खरेदी विक्री संघ, बार्शिटाकळी तालुका खरेदी विक्री संघ, अकोट तालुका खरेदी विक्री संघ, कवठा येथील ग्रीस्टेक शेतकरी उत्पादक कंपनी यांना प्रत्येकी एक लाख रू. दंड ठोठावण्यात आला व त्यांनी खरेदी केलेल्या ज्वारीचे कमीशन त्यांना अदा करण्यात येऊ असे समितीने निर्देश दिले. मुंडगाव येथील संस्थेने ६९ सातबारे एडिट करून खरेदी केली व नातेवाईकांच्या नावेही ज्वारी खरेदी झाली. त्यामुळे गैरप्रकाराचे गांभार्य लक्षात घेऊन काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय झाला, असे श्री. शेख यांनी नमूद केले आहे.

# भारतीय टपाल कार्यालयात ३५ हजार जागांवर भरती होणार

## दहावीच्या गुणांवर होणार निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ नागपूर:** भारतीय टपाल कार्यालय लवकरच देशातील ग्रामीण डाक सेवक भरती २०२६ बॅचशी संबंधित माहिती प्रसिद्ध करणार आहे. किमान ५०% गुणांसह दहावी उत्तीर्ण झालेले अर्जदार या पदांसाठी अर्ज करू शकतात. फॉर्म भरण्याची अर्ज प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने केली जाईल आणि सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर, अर्ज प्रक्रिया सुरू होईल.

२०२६ मध्ये, देशातील विविध शहरांमध्ये विविध पदांसाठी ३५ हजारहून अधिक उमेदवारांची भरती होणार आहे. अर्ज प्रक्रिया, अर्ज करण्याचे शुल्क आणि उमेदवारांच्या पात्रतेशी संबंधित माहिती खाली चर्चा केली आहे. अर्ज फॉर्ममध्ये काही सुधारणा असल्यास, पोस्ट ऑफिस विभाग दोन ते तीन दिवसांसाठी अर्ज विंडो उघडेल असा नियम आहे. निवडीच्या पुढील टप्प्यासाठी पात्र होण्यासाठी परीक्षेची तारीख देखील ते त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर एका सूचनेद्वारे प्रकाशित करतील.

नुसार, गार्मिन डाक सेवक ऑफ इंडियामध्ये नोकरीसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवारांसाठी ३५,००० हून अधिक रिक्त जागा आहेत. विभागाने देशात अर्ज प्रक्रिया सुरू करण्याबाबत अधिकृत सूचना जारी केल्यानंतर अर्जदार अर्ज करू शकतात. भारतीय पोस्ट ऑफिस अर्ज फॉर्म शुल्क २०२६

भारतात, पोस्ट ऑफिस २०२६ भरतीसाठी अर्ज शुल्क श्रेणींमध्ये विभागले गेले आहे. याचा अर्थ या विशिष्ट श्रेणी अंतर्गत येणाऱ्या उमेदवारांना भरण्याच्या प्रक्रियेदरम्यान शुल्क भरावे लागेल.

श्रेणी शुल्क

जनरल १००/-

ओबीसी/ईडब्ल्यूएस १००/-

एससी/एसटी १००/-

ऑनलाइन पेमेंट पद्धत: नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, इ.

इतका वेतन राहणार?

बहुतेक, इंडिया पोस्ट ऑफिस भरती २०२६ इंडियामध्ये पगार प्रत्येक पदानुसार बदलतो आणि उमेदवाराच्या पदानुसार २०,००० ते ७०,००० रुपयांपर्यंत असतो. अर्ज प्रक्रियेच्या सूचना जाणून घेण्यासाठी उमेदवार अधिकृत वेबसाइट हींींि:/ /ळपवळरींिेीीं.र्सेीं.ळप/ ला भेट देऊ शकतात. पोस्ट ऑफिस भरती २०२६ - आढावा

संघटना भारतीय पोस्ट विभाग

पदांची नावे गार्मिन डाक सेवक

एकूण रिक्त जागा ३५,०००+

सूचना स्थिती जानेवारी २०२६ (अपेक्षित)

अर्ज मोड ऑनलाइन / ऑफलाइन नोंदणी

शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

# १७५ जागा आल्या, तर भाजपाने बेईमानी करून निवडणुका जिंकल्या हे सिद्ध होईल-विजय वडेट्टीवार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ नागपूर-** ईव्हीएम संदर्भात तुमची भूमिका स्वच्छ आहे, तर निकालासाठी २० दिवस थांबायची वेळ का आली आहे? राज्यातील २६८ पैकी १७५ जागा भाजपाच्या येथील हे कशाच्या आधारावर बोलतात? तुम्ही कोणते दिवे लावले, ज्याने इतक्या जागा येईल? लाडक्या बहिणीच्या नावाचा वापर करून निवडून आले. ईव्हीएममध्ये घोळ करून निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न आहे. जर भाजपाच्या १७५ जागा आल्या तर भाजपाने बेईमानी करुन, ईव्हीएम हॅक करून निवडणुका जिंकल्या हे सिद्ध होईल, असा मोठा दावा काँग्रेस नेत्यांनी केला आहे.



नगरपालिका निवडणुकीत प्रशासनाचा गोंधळ दिसून आला आहे. निवडणूक ईव्हीएम मशिनच्या स्ट्राँग रुमबाहेर अनेक ठिकाणी गडबड आहे. त्यामुळे त्या ठिकाणी जॅमर लावा. रुमबाहेर मोठी स्क्रीन लावा, उमेदवाराला लाइव्हचे एक्सेस द्या. पण हे करायला निवडणूक आयोग तयार नाही, म्हणजे सरकारचा १७५ जागा मशिनच्या आधारावर जिंकणे हे टार्गेट आहे, असे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे.

# वेलवर्गीय भाजीपाला पिकांसाठी कीड नियंत्रणासाठी उपाययोजना, वाचा सविस्तर

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

वेलवर्गीय भाजीपाला पिकांमधील कीड नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन (खझच्) पद्धतीचा अवलंब करणे महत्त्वाचे आहे. कीड नियंत्रणासाठी काय काय उपाययोजना कराव्यात हे समजून घेऊयात...

**वेलवर्गीय भाजीपाला पिके - कीड नियंत्रण**

वेलवर्गीय भाजीपाला फळांवर फळमाशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे.

नियंत्रणासाठी फुले येण्याच्या काळात 'क्यू ल्यूर' कामगंध सापळे एकरी ५ या प्रमाणात मंडपात लावावेत.

फळांची काढणी योग्य पक्वतेस करावी. प्रादुर्भावग्रस्त फळांमधून फळमाशीची उत्पत्ती वाढत असल्याने अशी फळे गोळा करून नष्ट करावीत.

**वेलांखालील माती वेळोवेळी हलवून घ्यावी.**




कारली, पडवळ, दुधी भोपळा, दोडका या पिकांवर तांबडे भुंगेरे, मावा, तुडतुडे, फुलकिडे, पांढरी माशी इत्यादी किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो.

यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा अँझाडीरॅक्टीन (३०० पीपीएम) ५ मि.ली. प्रति लिटर पाणी या प्रमाणे प्रतिबंधात्मक फवारणी करावी.

**कोबीवर्गीय पिके आंतरमशागत**

कोबीवर्गीय पिकांची मुळे उथळ असल्यामुळे पाण्याच्या पाळ्या वरचेवर नियमित द्याव्यात.

या पिकास गड्डा तयार होण्याच्या वेळी पाण्याचा ताण पडल्यास गड्डे लहान राहतात.

लागवडीनंतर गरजेनुसार एक किंवा दोन खरपण्या करून माती भसभशीत आणि पीक तणविरहित ठेवावे.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ५ डिसेंबर २०२५

शहर/ग्रामिण

## सोयाबीन खरेदीचा मुद्दा पेटला

# नाफेड व वखार महामंडळाचा सोयाबीनचे पोते जाळत शेतकऱ्यांचा निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५तिवसा–** तालुक्यातील शेतकरी आधीच नैसर्गिक आपत्तीने हवालदील झालेला असताना त्या पाठोपाठ नाफेड सुद्धा शेतकऱ्यांच्या जीवावर उठले आहे अशी विद्यमान परिस्थिती सोयाबीन खरेदी केंद्रावर सरकारी यंत्रणेने आणून ठेवली.

सोयाबीन खरेदी करण्यासंदर्भात सुमारे ३७ प्रकारच्या जाचक अटी शेतकऱ्यांना घालून वखार महामंडळाने व नाफेडणे गेल्या आठवड्याभरात अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनला बाहेरचा रस्ता दाखविला आहे.

यंदापूरस परिस्थिती अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातचे पीक गेले असून शेतकऱ्यांना जाहीर झालेली मदत सुद्धा अल्पशी असून ती सुद्धा पूर्णपणे शेतकऱ्यांना मिळालेली नाही.

एफ ए क्यू दर्जाचा माल खरेदी होत असताना वखार महामंडळाने चांगल्या सोयाबीनवर सुद्धा आक्षेप घेत उत्पादन झालेल्या सोयाबीन मध्ये आणखी किती चांगले सोयाबीन विकावे किंवा आणावे हा प्रश्न शेतकऱ्यांना व केंद्राला पडलेला आहे.

शेतकऱ्यांचे चक्कर वाया जात असून त्यांना गाडी भाडे सुद्धा जवळून भरावे लागत आहे आधीच कुठल्या शेतमालाला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली आहे.

या जाचक अटी रद्द करून नोंदणी झालेल्या सर्व शेतकऱ्यांचे सोयाबीन काही प्रमाणात सवलत देऊन खरेदी करण्यात यावे ही



मागणी आज तालुकास्तरीय समितीकडे उपस्थित शेतकऱ्यांनी व तालुका कॉंग्रेस कमिटीने लावून धरली.

यावेळी नाफेड,वखार महामंडळ, खरेदी-विक्री संघाचे अधिकारी पदाधिकारी, तहसीलदार तिवसा, कृषी अधिकारी, पोलीस निरीक्षक तिवसा, वखार महामंडळाचे गोडाऊन निरीक्षक आदी अधिकाऱ्यांचा लवाजमा कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात दाखल झाला होता यावेळी त्यांना शेतकऱ्यांच्या रोशाला सामोरे जावे लागले यावेळी त्यांनी सरकारच्या या नियोजनाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली .

एवढी खरेदी विक्री संघाने सुद्धा शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान बघता खरेदी बंद करण्याचा इशारा देत ही सर्व यंत्रणा नाफेड वखार महामंडळानेच राबवावी असा इशारा दिला.

नाफेडच्या व वखार महामंडळाच्या चुकीच्या नियोजनाबद्दल उपस्थित शेतकरी व तालुका कॉंग्रेस कमिटीने आपला रोष व्यक्त करत, यावेळी सोयाबीन चे पोते जाळून सरकारचे लक्ष अधिवेशनात वेदाव्य लोकप्रतिनिधींनी यावर प्रश्न उपस्थित करून शेतकऱ्यांचे सोयाबीन तातडीने खरेदी करावे व त्यांना हमी भाव द्यावा यासाठी जोरदार निदर्शने करत उपस्थित अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

यावेळी ता. अध्यक्ष वैभव वानखडे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सुरेश मेटकर, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती रवी राऊत,संचालक लोकेश केने, संचालक प्रविण साबळे, नगरसेवक योगेश वानखडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अजय सुरटकर, प्रणव गौरखेडे, अनिकेत तालन, अक्षय पवार, वैभव काकडे, वैभव ढवळे, प्रहार पक्षाचे प्रवीण केने, आकाश मकेश्वर, आधी पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# धुक्याचा फटका अमरावती -मुंबई विमानसेवेला

## अमरावती-मुंबई विमानसेवा १५ डिसेंबरपर्यंत बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ अमरावती :-** राज्यात बदलत्या हवामानामुळे कुठे ढगाळ वातावरण तर कुठे थंडी पाहायला मिळत आहे. अनेक जिल्ह्यांचा पारा घसरल्याने नागरिकांमध्ये हुडहुडी वाढली आहे. तसेच अनेक ठिकाणी सकाळच्या सुमारास आणि इतर वेळी धुके पाहायला मिळत आहे. दाट धुक्यामुळे दृश्यमानतेची समस्या निर्माण झाली आहे. या धुक्याचा फटका अमरावती-मुंबई विमानसेवेला बसला आहे. दाट धुक्यामुळे येत्या १५ डिसेंबरपर्यंत विमानसेवा बंद राहणार आहे.

१५ डिसेंबरनंतरही विमानसेवा सुरळीत होणार की नाही हे हवामानावर अवलंबून असेल. मात्र १५ दिवसांहून जास्त काळ विमानसेवा बंद असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचा सूर आहे. गेल्या महिन्याच्या सुरूवातीला देखील विमानसेवेला दाट धुक्याचा फटका बसला होता. ३ नोव्हेंबरला अमरावतीच्या विमानतळावर धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने विमानसेवा रद्द करण्यात आल्याचे विमानतळ व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले होते. अलायन्स एअर कंपनीच्या मुंबई - अमरावती - मुंबई या विमानसेवेच्या वेळेत बदल झाल्यानंतर विमानसेवा रद्द होण्याचा हा पहिलाच प्रसंग होता, तरी त्यामुळे प्रवाशांना त्रास झाला होता.

विमानसेवेच्या वेळेत गेल्या २६ ऑक्टोबरपासून बदल करण्यात आला आहे. ही विमानसेवा आता आठवड्यातून चार दिवस सुरू करण्यात आली आहे. दर रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी सकाळी ७.३० वाजता विमान मुंबईहून उड्डाण घेते आणि सकाळी ८.५० वाजता अमरावती विमानतळावर पोहोचते. त्यानंतर परतीचे विमान सकाळी ९.१५ वाजता




मुंबईकडे झेपावते आणि सकाळी १०.३० वाजता मुंबई विमानतळावर पोहचते. ही विमानसेवा आधी संध्याकाळी होती. ही वेळ दिवसभराच्या कामासाठी मुंबईला जाणाऱ्या प्रवाशांसाठी गैरसोयीची असल्याने विमानाच्या वेळेत बदल करण्याची मागणी प्रवाशांकडून सातत्याने केली जात होती, त्यामुळे विमान कंपनीने विमानसेवेच्या वेळेत बदल केला आहे.३ नोव्हेंबरला सकाळी अमरावती विमानतळावर धुक्यामुळे दृश्यमानता कमी असल्यामुळे विमान उतरण्याची शक्यता नसल्याने मुंबईहून येणारे विमान रद्द करण्यात आले होते. विमान उशिरा आले असते, तर विमानाची इतर उड्डाणे रद्द करावी लागली असती, त्यामुळे अमरावतीकडे हे विमान झेपावलेच नाही, अशी माहिती विमानतळ व्यवस्थापनाकडून देण्यात आली होती. या गोंधळात अमरावतीच्या प्रवाशांना आल्या पावली विमानतळावरून परतावे लागले होते.आता १५ डिसेंबरपर्यंत विमानसेवा बंद असल्याने प्रवासाचे नियोजन करणाऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. ज्यांनी बुकिंग करून ठेवले, त्यांना विमानसेवा रद्द झाल्याचे संदेश पाठवले जात आहेत. त्यामुळे प्रवाशांना पर्यायी मार्ग शोधावा लागत असून नाराजीचा सूर उमटला आहे.

# ड्रायव्हिंग लायसन्ससाठी होणार ऑन-कॅमेरा टेस्ट

## अपात्र चालकांना बसेल आळा !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती**

ड्रायव्हिंग लायसन्स मिळवणे आता खऱ्या अर्थाने 'कठोर परीक्षेची' कसोटी ठरणार आहे. परिवहन आयुक्तांच्या नव्या




निर्देशांनुसार आरटीओमध्ये घेतली जाणारी ड्रायव्हिंग टेस्ट आता ठराविक वेळेत, कॅमेऱ्यांच्या नजरेखाली आणि अधिक पारदर्शक पद्धतीने होणार आहे. कठोर वेळापत्रक, ऑन-कॅमेरा टेस्ट आणि वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून पास झालेल्यांची पुन्हा ड्रायव्हिंग टेस्ट होणार आहे. या सर्वामुळे अपात्र चालकांना आळा बसेल, तर रस्त्यांवर अधिक सक्षम व जबाबदार वाहनचालक उतरतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्त्यावर होणाऱ्या अपघातांपैकी सुमारे ८० टक्के पेक्षा अधिक अपघात हे वाहन चालकाच्या बेफिकीर वृत्ती व निष्काळजीपणामुळे होतात. अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी योग्य चालकांनाच वाहन परवाना मिळावा (ड्रायव्हिंग लायसन्स) या हेतुने परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी आरटीओतील गुणवत्तापूर्ण 'ड्रायव्हिंग टेस्ट'बाबतचे निकष तयार केले आहेत. त्या संदर्भाचे पत्र ३ डिसेंबर रोजी सर्व आरटीओला देण्यात आले आहे. यात दुचाकीसाठी ५ मिनीट, कारसाठी ७ मिनीट तर अवजड वाहनांसाठी १० मिनीटांचा कालावधी देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, ही टेस्ट 'ऑन-कॅमेरा' होणार आहे. एवढेच नाही तर ड्रायव्हिंग टेस्टमध्ये १० टक्केच उमेदवार नापास झाल्यास प्रादेशिक परिवहन अधिकारी किंवा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पास झालेल्या उमेदवाराची स्वत:हून टेस्ट घेण्याचा सूचनाही दिल्या आहेत. नियमांचा भंग करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयास प्रस्ताव सादर करण्याचेही पत्रात निर्देश दिले आहेत.

### प्रत्येक ड्रायव्हिंग टेस्ट कॅमेऱ्याच्या निगराणीत घ्यावी.

टेस्टच्या आदल्यादिवशी ड्रायव्हिंग टेस्ट देणाऱ्या उमेदवारांची प्रिंट काढून कोणता निरीक्षक किती ड्रायव्हिंग टेस्ट घेणार याची यादी तयार करून ती दुसऱ्या दिवशी दर्शनी ठिकाणी लावावी.

ड्रायव्हिंग स्कुलमार्फत येणाऱ्या उमेदवाराची चाचणी संबंधित ड्रायव्हिंग स्कुलच्या वाहनावर घ्यावी. चाचणीपूर्वी वाहनाच्या कागदपत्रांची तपासणी करावी

ड्रायव्हिंग टेस्टनंतर निरीक्षकांनी अंतिम मान्यतेचे काम विहित कालावधीत संगणकावर करावे.

ड्रायव्हिंग टेस्ट परिसरात ३० दिवसांच्या आत सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे.

# शेतकऱ्यांना अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा ऑनलाइन लाभ, महाडीबीटी पोर्टलवर करता येणार अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती** - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तत्काळ मदत पोहोचवण्यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, आता गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजनेचा लाभ आता शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलद्वारे थेट ऑनलाइन मिळणार आहे. यापूर्वी हा लाभ केवळ ऑफलाइन मिळत होता. पण आता नव्या निर्णयानुसार तो ऑनलाइन मिळेल. त्याचा लाभ राज्यातील हजारो शेतकऱ्यांना मिळेल.

राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या नव्या निर्णयाची घोषणा केली. ते म्हणाले, शेतात काम करताना विविध कारणांमुळे होणाऱ्या अपघातांमुळे अनेक शेतकऱ्यांचा मृत्यू होतो किंवा त्यांना अपंगत्व प्राप्त होते. अशा घटनांत शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी म्हणून राज्य सरकारने १९ एप्रिल २०२३ पासून गोपीनाथ मुंडे




शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना सुरू केली होती. त्यात शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख, तर १ डोळा किंवा १ अवयव कायमस्वरुपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाते.

**आता अर्ज मंजूर होण्यास होणार नाही विलंब**

आतापर्यंत या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी किंवा त्यांच्या वारसदारांना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सविस्तर प्रस्ताव व आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागत होती. त्यात कागदपत्रांतील त्रुटी, पूर्ततेतील विलंब आदी कारणांमुळे अनुदान देण्यास विलंब होत होता. यावर उपाय म्हणून राज्य सरकारने ही संपूर्ण अर्जप्रक्रिया महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला आहे, असे कृषिमंत्री म्हणाले.


### योजनेसाठी १२० कोटींची आर्थिक तरतूद

तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडून प्रस्तावांची तपासणी करण्यात येईल. त्यानंतर तहसीलदारांच्या नेतृत्वातील समिती त्याला मंजुरी देईल. अखेर मंजूर अनुदानाची रक्कम थेट डीबीटीद्वारे शेतकरी किंवा वारसदारांच्या बँक खात्यात जमा होईल. या योजनेंतर्गत चालू आर्थिक वर्षासाठी १२० कोटींची तरतूद केली आहे. आज अखेर ४३५९ शेतकरी प्रस्तावांना ८८.१९ कोटी रुपये त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आलेत. महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने योजना राबवल्यामुळे प्रक्रिया अधिक वेगवान, पारदर्शक आणि शेतकरी केंद्रित होईल, असेही कृषिमंत्र्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

ते पुढे म्हणाले, सरकारच्या निर्णयामुळे ऑनलाइन अर्जप्रक्रियेमुळे अपघातग्रस्त शेतकरी किंवा त्यांचे वारसदार घराबाहेर न पडता त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणावरूनच अर्ज भरू शकतील. अर्जाची सद्यस्थितीही महाडीबीटी पोर्टलवर पाहता येईल. पोर्टलवर अर्ज भरल्यानंतर तो थेट कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लॉगईनवर जाईल. त्यानंतर कागदपत्रांत त्रुटी आढळली तर त्याची माहिती थेट संबंधित शेतकरी किंवा त्याच्या वारसदारांना मोबाइलद्वारे मिळेल. त्यामुळे त्यांचा शासकीय कार्यालयात चकरा मारण्याचा फेरा संपेल.

## ६४ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा

# अमरावती केंद्रातून अंबापेठ क्लब चे 'वारकरी' प्रथम



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५मुंबई,**

६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत अमरावती केंद्रातून अंबापेठ क्लब, अमरावती या संस्थेच्या ड. प्रशांत देशपांडे निर्मित वारकरी या नाटकाला प्रथम पारितोषिक तसेच सरकार बहुउद्देशीय संस्था, अमरावती या संस्थेच्या दशानन या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक श्री. बिभीषण चवरे यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे केंद्रावरील अन्य निकालामध्ये पंचशील बहुउद्देशीय स्वयंसेवी संस्था, परतवाडा या संस्थेच्या उत्तरायण या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.

दि. १४ नोव्हेंबर, २०२५ ते २८ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत छत्रपती श्री शिवाजी महाराज सभागृह, अमरावती येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण १४ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. मुकुंद महाजन, श्री. गुरु वठारे आणि श्रीमती विजया कुडव यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या नाटकांच्या संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले.

राज्य नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सहभागी झालेल्या सर्व संस्था आणि कलाकार यांनी मेहनत घेऊन सादर केलेल्या सर्व दर्जेदार नाटकांना प्रेक्षकांनी चांगली दाद दिली. भविष्यातही संस्था व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केलेली आहे.

यास्पर्धेकरिता अमरावती केंद्रावर श्री. विशाल फाटे यांनी समन्वयक म्हणून काम पहिले. या आयोजनातील पूर्वीचे समन्वयक तथा अमरावती जिल्हा नाट्य परिषदेचे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखर डोरले यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून त्यांना अंतिम स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

दिग्दर्शन: प्रथम पारितोषिक वैभव देशमुख (नाटक - दशानन),
द्वितीय पारितोषिक डॉ. चंद्रकांत शिंदे (नाटक - वारकरी),
तृतीय पारितोषिक गणेश वानखेडे (नाटक - उत्तरायण)
प्रकाश योजना :- प्रथम पारितोषिक अनुप बहाड ( नाटक - दशानन),
द्वितीय पारितोषिक दीपक नांदगांवकर (नाटक- जेंडर आयडेंटीटी),
तृतीय पारितोषिक गायत्री गुडधे (नाटक- वारकरी)
नेपथ्य : प्रथम पारितोषिक ड. प्रशांत देशपांडे (नाटक-वारकरी)
द्वितीय पारितोषिक शुभम ठाकरे ( नाटक - दशानन),
तृतीय पारितोषिक संजय काळे (नाटक- उत्तरायण)
रंगभूषा :- प्रथम पारितोषिक निलेश ददगाळ (नाटक- दशानन),
द्वितीय पारितोषिक प्रतिक्षा ग (नाटक-वारकरी),
तृतीय पारितोषिक अभिजित देशमुख (नाटक- श्वेतवर्णी शामकर्णी)
पार्श्वसंगीत: प्रथम पारितोषिक प्रथमेश पुरभे (नाटक- वारकरी),
द्वितीय पारितोषिक अंकित शर्मा (नाटक- दशानन),
तृतीय पारितोषिक वैभव ओगले (नाटक- उत्तरायण)
वेशभूषा: प्रथम पारितोषिक ड. श्रध्दा पाटेकर (नाटक- वारकरी),
द्वितीय पारितोषिक अभिजित झाडे ( नाटक - दशानन),
तृतीय पारितोषिक किर्ती देशमुख (नाटक- श्वेतवर्णी शामकर्णी)
उत्कृष्ट अभिनय :- रौप्यपदक (पुरुष) वैभव देशमुख (नाटक - दशानन)
रौप्यपदक (महिला) रिया गिते ( नाटक - वारकरी),
अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे :
रेणूका पुराणिक (नाटक- दशानन),
अनुराधा वाठोडकर ( नाटक- उत्तरायण),
सिध्दी काळे (नाटक- श्वेतवर्णी शामकर्णी),
मोहिनी राठोड ( नाटक - कटपिस सासू),
सौरभ शेंडे (नाटक-जेंडर अन् आयडेंटिटि),
अजित वडवेकर (नाटक- एकेक पान गळावया),
डॉ. चंद्रकांत शिंदे (नाटक- वारकरी),
किशोर तळोकार (नाटक-श्वेतवर्णी शामकर्णी)

# संतप्त नागरिकांकडून पालिकेने बंदोबस्त करण्याची केली मागणी

## पिसाळलेल्या श्वानांचा २१ जणांना चावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ तिवसा–** शहरात गेल्या काही दिवसांपासून पिसाळलेल्या मोकाट श्वानाचा मोठ्या प्रमाणावर हैदोस वाढला आहे. या मोकाट श्वातांनी लहान मुलांसह अनेकांना चावा



घेतल्याच्या घटना घडल्या असून अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने तातडीने मोकाट स्वाताचा बंदोबस्त करावा अशी मागणी संतप्त नागरिकांकडून केली जात आहे. पिसाळलेल्या स्वानाचा शहरातील विविध प्रभागात मोठा उद्रेक वाढला असून दिवसा व रात्री मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पदचारी, दुचाकीस्वार व चारचाकी वाहनाच्या मागे ते पळतात. मोकाट व पिसाळलेल्या श्वानांनी अनेकांच्या अंगावर धावून त्यांना यावा घेतल्याच्या घटना मागील सात दिवसांत घडल्या असून यामुळे नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. गेल्या तीन दिवसात सात ते आठ जणांना पिसाळलेल्या स्वानाने चावा घेतला असून यामध्ये लहान मुलांचा देखील समावेश आहे.

**सात दिवसात २१ जणांना चावा**

दोन दिवसापूर्वी एक पिसाळलेले श्वान थेट तिवसा विश्राम गृहाच्या परिसरात शिरले आणि येथील लुम्बिनीनगर तसेच शहरात विविध ठिकाणी खानसाम्याच्या पायाला चावा घेतला. आंनदवाडी, पिसाळलेल श्वानांनी अनेकांना चावा घेतला. तिवसा उपजिल्हा रुग्णालयात सात दिवसांत २९ जणांना चावा घेतल्याची नोंद आहे.

### नसबंदीसाठी निविदा काढली

शहरातील मोकाट स्वानांची नसबंदी करण्याबाबतची निविदा काढण्यात आली आहे. तसेच पिसाळलेल्या श्वरांना जेरबंद करण्याचे कारवाई करू

**ऋषीकेश देशमुख, स्वच्छता अभियंता**

### सुरक्षेचा प्रश्न नागरिकांच्या

शेजारी लहान मुले खेळत माझी मुलगी व घरा होती. अशातच एका पिसाळलेल्या कुत्र्याने हल्ला चढवून दोन मुलींना चावा घेतला. यावेळी मी त्या कुत्र्याला हटकले असता माझ्या ही हाताल चावा घेतला. अशा पिसाळलेल्या कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे लहा मुलांसह नागरिकांच्या सुरक्षितेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे प्रशासनाने लक्कर अशा कुत्र्यांचा बंदोबस्त करावा.

# सरपंच पती, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी व कंत्राटदारावर गुन्हा

## लाच मागितल्याचे प्रकरण : ग्रामरोजगार सेवकाची तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** तरुणाने ग्राम रोजगार सेवक म्हणून काम केले. त्या कामाचे १ लाख ६२ हजार रुपये मानधन झाले. बाच मानधनाच्या चेकवर सरपंच असलेल्या पत्नीची स्वाक्षरी आणून देतो, म्हणून महिला सरपंचाच्या पतीने व ग्रामसेवकाने त्या तरुणाला लाचेची मागणी केली होती. तसेच या मागणीला भातकुली पंचायत समितीला कार्यरत असलेल्या विस्तार अधिकारी (पंचायत) व एका कंत्राटदाराने प्रोत्साहन दिल्याचे एसीबीच्या चौकशीत समोर आले. त्यामुळे एसीबीने वा चौघांविरुद बुधवारी (दि. ३) रात्री लाच मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

सरपंच पती शशिकांत मनोहरराव मेश्राम (३५ रा. कवठा बहाळे, ता. भातकुली ह. मु. पार्वती नगर क्र. दोन, अमरावती), ग्रामसेवक सुरेंद्र अजाबराव कुरवाडे, (४०, ग्रामपंचायत, कवठा बहाडे, रा. कठोरा नाका परिसर, अमरावती), विस्तार अधिकारी (पंचायत) प्रल्हाद नामदेवराव तेलंग (५३, रा. जिजाऊ कॉलनी, अर्जुन नगर अमरावती) आणि कंत्राटदार चंदन बाबाराव नागमोते (३८. रा. पार्वती नगर नंबर १, अमरावती) या चौघांविरुद्ध एसीबीच्या तक्रारीवरून खोलापुरी




गेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एसीबीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील तक्रारदार कवठा बहाले येथे ग्रामरोजगार सेवक म्हणून कार्यरत होते. त्यांनी केलेल्या कामाचे १ लाख ६२ हजार ५०० रुपये मानधन झाले होते. या मानधनाच्या चेकवर सरपंचांची सही सरपंचांची सही आणून देण्यासाठी आवश्यक होती. दरम्यान चेकवर शशिकांत मेश्राम व ग्रामसेवक सुरेंद्र कुरवाडे यांनी ५० हजार रुपये लाचेची मागणी तक्रारदाराला केली होती. त्यावरून २७ ऑक्टोबर व १९ नोव्हेंबर रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने पडताळणी केली होती.

त्यावेळी चेकवर सही आणण्यासाठी शशिकांत मेश्राम यांनी तसेच ग्रामसेवक सुरेंद्र कुरवाडे यांनी प्रभाव टाकून तक्रारदाराकडून ३० हजार रुपयाची लाच घेण्याचे तडजोडीअंती मान्य केले होते. याचवेळी भातकुली पंचायत समितीला प्रल्हाद तेलंग व कंत्राटदार चंदन नागमोते कार्यरत विस्तार अधिकारी (पंचायत) यांनी लाच देण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचे पडताळणी कारवाईदरम्यान एसीबीला निष्पन्न झाले होते. पोलिसांचा पुढील तपास सुरु आहे.

**लाच स्वीकारली नाही तक्रारदारावर संशय आल्याने**

त्या आधारे १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सापळा रचण्यात आला होता मात्र शशिकांत मेश्राम व सुरेंद्र कुरवाडे यांना तक्रारदारावर संशय आल्याने त्यांनी लाच स्वकम पथकाने लाच मागणी केल्याप्रकरणी स्वीकारली नाही, त्यावरून एसीबीच्या चौधाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई एसीबीचे पोलीस अधिक्षक बापू सुनील किनगे, पोलीस निरीक्षक योगिता बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधिक्षक ठाकरे व त्यांच्या पथकाने केली आहे..

# मराठवाडा, विदर्भ पुन्हा गारठणार!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.६अमरावती–** दितवाह नावाच्या चक्रीवादळाचा सावट सरल्यावर हवामानात बदल दिसू लागला असून, महाराष्ट्रात पुन्हा थंडीचा प्रभाव जाणवू लागला आहे. घाटमाथ्यावरील भागांमध्ये कडाक्याची थंडी वाढली असून राज्यभर गारठ्याचा मोठा मुक्काम स्पष्ट होत आहे. देशाच्या उत्तरेकडील पर्वतीय राज्यांमध्ये किमान तापमानात घट झाली असून उंच पर्वतरांगांमध्ये हिमवर्षाव वाढला आहे, ज्यामुळे या भागांमध्ये तापमान उणेच्या श्रेणीत दिसत आहे. उत्तरेकडील फक्त पर्वतीय भाग नव्हे, तर मैदानी प्रदेशांमध्येही थंडी वाढली आहे. मध्य भारताकडे वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे महाराष्ट्रातही तापमानात



घट झाली असून हवामान विभागाने पुढील ४८ तास फक्त गारठ्याचे राहणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. विशेषतः मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, पंजाब आणि हरियाणा या भागांमध्ये थंडीचे प्रमाण जास्त राहील, तर राज्यात तळ कोकण सोडून सर्वत्र गारठा जाणवेल.

घाटमाथ्यावरील प्रदेशांमध्ये धुक्याची चादर पसरली असून, विदर्भमध्ये किमान तापमान सरासरी ७ अंश सेल्सिअस इतके असेल, तर कमाल तापमान सरासरी ३३ अंश सेल्सिअस इतके राहील. समुद्रावर तयार झालेल्या चक्रीवादळसदृश्य परिस्थिती कमकुवत झाली असली तरी दक्षिण भारतात पावसाचा इशारा कायम आहे. कमी दाबाच्या पट्ट्यांमुळे पुढील २४ तासांत केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकच्या किनारपट्टीवर अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. तर हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि काश्मीरच्या खोर्यांमध्ये पश्चिमी झंझावात सक्रीय होण्याने काही ठिकाणी पाऊस आणि हिमवृष्टीमुळे हाडं गोठवणारी थंडी पडण्याची शक्यता आहे.

# ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान’ अंतर्गत श्रमदानातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नांदगाव पेठ–** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून गुरुवारी नांदगाव पेठ ग्रामपंचायतच्या वतीने लोकसहभाग आणि श्रमदानाच्या बळावर वनराई बंधारा बांधण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले. गटविकास अधिकारी तूपे आणि विस्तार अधिकारी सीडाम यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी उत्साहाने सहभाग नोंदवत लोकसहभागाचा आदर्श उभा केला.वनराई बंधाऱ्याच्या बांधकामामुळे गावातील जलसंधारण क्षमतेत वाढ होऊन शेतीसाठी आवश्यक पाण्याचा स्थिर स्रोत निर्माण होणार आहे.

विशेष म्हणजे, या उपक्रमात ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य, गावातील युवक, महिला मंडळे तसेच सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या एकजुटीने श्रमदान करून सरकारी योजना व लोकसहभाग यांची उत्कृष्ट सांगड घातली. गटविकास अधिकारी तूपे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, पाण्यासारख्या अत्यावश्यक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्यासाठी लोकसहभाग हीच खरी ताकद आहे. नांदगाव पेठ ग्रामस्थांनी दाखवलेला उत्साह अनुकरणीय आहे. विस्तार



अधिकारी सिडाम यांनी सुद्धा ग्रामस्थांचे प्रोत्साहन करत सांगितले की, अभियानाच्या उद्दिष्टांनुसार गावच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असून नांदगाव पेठने त्यात पुढाकार घेतल्याने गाव विकासाचा आदर्श निर्माण झाला आहे.या श्रमदानातून उभारण्यात आलेल्या वनराई बंधाऱ्यामुळे पाणीसाठा वाढण्याबरोबरच स्थानिक जैवविविधतेलाही हातभार लागणार असून ग्रामविकासाचा पाया अधिक मजबूत होणार आहे. ग्रामस्थांचा सहभाग, प्रशासनाचे मार्गदर्शन आणि विकासाचा स्पष्ट संकल्प यामुळे नांदगाव पेठने पुन्हा एकदा सामूहिक शक्तीची जाणीव करून दिली आहे. यावेळी सरपंच कविता डांगे, उपसरपंच मझहर खा सफदर खा, ग्रामपंचायत अधिकारी कु. हर्षदा बोंडे सर्वश्री सदस्य शिवराजसिंह राठोड,साहेबराव उर्फ छत्रपती पटके,मंदा कापडे, विभा देशमुख, जगदीश इंगोले, किशोर नागापुरे, श्रीधर राऊत, बलविर चव्हाण,मो.शाकिर परवेज मो साबीर, सलमा सुलताना हमीदशाह,आशा चंदेल, वृषाली इंगळे, उर्मिला गायगोले, वंदना भटकर ग्रामपंचायत कर्मचारी राहुल बोडखे,राहुल भोपळे, गोपाल शेळके यांच्यासह गावकरी उपस्थित होते.


# नांदगाव पेठ येथे शिवसेनेचा तालुकास्तरीय कार्यकर्ता मेळावा

## आगामी जि.प,पं.स. निवडणुकीत पाचही मतदारसंघात उमेदवार उभे करण्याची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नांदगाव पेठ**

नांदगाव पेठ येथे शिवसेना अमरावती तालुक्याच्या वतीने श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिराच्या निसर्गरम्य परिसरात शिवसैनिकांचा भव्य मेळावा उत्साहात पार पडला. या मेळाव्यात तालुक्यातील असंख्य शिवसैनिकांची उपस्थिती पाहायला मिळाली. मेळाव्यात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत अमरावती तालुक्यातील सर्व पाचही मतदारसंघांमध्ये शिवसेना ताकदीनिशी उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा शिवसेना तालुकाप्रमुख नितीन हटवार यांनी केली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी खा.अनंतराव गुढे, शिवसेना जिल्हाप्रमुख पराग गुडदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती भैय्यासाहेब निर्मळ,



ज्येष्ठ शिवसैनिक अरुण भालेराव, डॉ. नरेंद्र निर्मळ, डॉ. गिरी, अशोक भाऊ आदी मान्यवर उपस्थित होते.प्रारंभी माजी खा. गुढे यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी संगमेश्वर मंदिरात आरती करून महादेवाचे दर्शन घेतले.या प्रसंगी माजी खा. अनंतराव गुढे यांनी शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा बाळासाहेबांनी दिलेला मूलमंत्र असून, प्रत्येक शिवसैनिकाने तो आचरणात आणणे आवश्यक आहे. आगामी जि.प.व पं. स. निवडणुकीत शिवसेना पाचही मतदारसंघात पूर्ण ताकदीने उतरून यश मिळवणार आहे.पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाला अधिक बळकटी मिळवून देण्यासाठी ही निवडणूक अत्यंत महत्त्वाची आहे, असे मत माजी खा. गुढे यांनी व्यक्त केले. तालुकाप्रमुख नितीन हटवार यांनी आपल्या प्रास्ताविकात संगमेश्वर तीर्थक्षेत्रासह तालुक्यातील सर्वांगीण विकासासाठी शिवसेना कटिबद्ध असल्याचे सांगितले. तर जिल्हाप्रमुख पराग गुडदे यांनी शिवसेनेच्या विजयासाठी आणि उद्धवसाहेबांची ताकद वाढवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने एकदिलाने काम करणे गरजेचे आहे, असे सांगत उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.मेळाव्यात शिवसेनेचे नवनियुक्त सेवा सहकारी सोसायटी संचालक आनंद लोहोटे व किशोर नागापुरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे प्रहारचे योगेश राऊत यांनी या मेळाव्यात शिवसेनेत जाहीर प्रवेश करून पक्षाला नवी उर्जा दिली.

कार्यक्रमाला शाखाप्रमुख किशोर राऊत, अरुण राऊत, विजय कापडे,माजी पं. स. सदस्य दिगंबर आमले,विनोद गभने, पंकज वंजारी, विनोद सुने, दिलीप चौधरी, प्रकाश शेळके, विनोद भंडाळकर, वलगाव शाखाप्रमुख नरेश कलाने, उमेश निर्मळ, अविनाश वानखडे, प्रमोद वाघ, मनोज मोरे, रमेश साकोरे, तंटामुक्ती अध्यक्ष संजय चौधरी, ज्योतीराम कोरटकर, सुधाकर तायडे, अरुण ठाकरे, मोरेश्वर इंगोले, सचिन पाटील, संजय काका, सिंधुताई डोईफोडे, विजय कातोरे, बबनराव साठवने, एकनाथ उपकार यांसह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# प्राध्यापकाची एक कोटींनी फसवणूक पाच जणांवर गुन्हा, एकाला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नागपूर**

बनावट गुंतवणूक फर्म चालवणाऱ्या पाच जणांनी संगनमत करत कट रचून अमरावती येथील प्राध्यापकाची एक कोटी रुपयांनी फसवणूक केल्याचा प्रकार गुरुवारी समोर आला. फसवणूक करणाऱ्या या पाच जणांपैकी एकाला सदर पोलिसांनी अटक केली. फसवणूकीतला सूत्रधार छत्तीसगडमधील रायपूर येथील रहिवासी असल्याची माहिती आहे.

विजय केशवराव टोपे (५२) रा. संतकृपा निवास, अंबापेठ, अमरावती असे एक कोटी रुपयांची फसवणूक झालेल्या प्राध्यापकांचे नाव आहे. गुंतवणूकीवर १५ दिवसांत ४०




टक्के नफा कमावून देतो, असे आमिष दाखवत टोपे यांना प्रशांत नायडू (५०) रा. कामठी, महेश वरघडे (४५) रा. मानेवाडे, संतोष सातपुते रा. बुलडाणा, विजय बघेल रा. रायपूर यांनी गुंतवणूक करण्यात भाग पाडले. यातील बुलडाणा जिल्ह्यातील रहिवासी संतोष हा एका समविचारी मित्रांमार्फत टोपे यांच्या संपर्कात आला होता. गुंतवणूक केली तर अल्पावधीत ४० टक्क्यांपर्यंत नफा कमावता येतो, असे आमिष दाखवत संतोषने टोपे यांची नागपुरात अन्य पाच जणांची ओळख करून दिली. त्यावर विश्वास बसल्याने टोपे यांनी काही जणांना ही योजना समजावून सांगत आठ मित्रांनी मिळून या पाच जणांकडे १ कोटी रुपये गुंतवले. टोपे यांनी नागपुरातील एका खासगी गुंतवणूक कंपनीच्या कार्यालयात ही रक्कम ठकबाजांकडे दिली.

त्यावर १५ दिवसांत १ कोटी ४० लाखांचा परतावा देऊन हे पाचही जण बेपत्ता झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर टोपे यांनी सदर पोलिसांत तक्रार केली. त्यावरून गुन्हा दाखल करत पोलिसांनी संतोष सातपुते याला अटक केली. रायपूर येथील रहिवासी विजय बघेल हा या बनावट गुंतवणूक कंपनीचा सूत्रधार असून पोलीस त्याच्या अटकेसाठी छत्तीसगड पोलिसांशी संपर्कात आहेत.

# जप्त केलेला ट्रॅक्टर दर्यापूर तहसील कार्यालयातून चोरी

## दोन महिन्यातील दुसरी घटना

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५दर्यापूर**

वाळुची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर महसूल पथकाने कारवाई करून तहसील कार्यालयात जप्त करण्यात आला होता. परंतु हा ट्रॅक्टर तहसील कार्यालयातून लंपास झाल्याची घटना गुरुवार (दि. ४) रोजी सकाळी उघडकीस आली. दोन महिन्यातील चोरीची ही दुसरी घटना होय.दर्यापूर–अमरावती मार्गावरील नव्यानेचबांधलेल्या शासकीय इमारतीतून तहसील प्रशासनाचा कारभार चालतो. गत मार्च महिन्यात थिलोरी शिवारातअवैधरित्या वाळूची वाहतूक करणारी ट्रॅक्टर–ट्रालीविरूध्द महसूल पथकाने करावाई करीत जप्त केला. ही ट्रॅक्टर–ट्राली तहसील कार्यालयाच्या आवारात उभी करण्यात आली होती. दरम्यान गुरवारी रात्री १ वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्याने तहसील कार्यालयाच्या मुख्यप्रवेशदाराचा कुलूपकोंडा तोडून क्र.एमएच. २७ डीयू. १८७५ ट्रॅक्टर लंपास केला आहे

# शिरजगाव मोझरी परिसरात बिबट्या

## दोन आठवड्यापासून वन विभाग बिबट्याला पकडण्यात अपयशी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५तिवसा**

शिरजगाव मोझरी येथून जवळच असलेल्या कोळवा मौजा मध्ये काही शेतकऱ्यांना बिबट्याचे प्रत्यक्ष दर्शन झाले. त्यामुळे शेतकरी व – ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहेत. याची माहीती ग्रामस्थांमार्फत वन विभागाला देण्यात आली. नेहमीप्रमाणे (गुरुवारी) ३ रोजी दु. १२, वाजताच्या सुमारास शिरजगाव येथील शेतकरी किसना हटवार हे कुटुंबियांसह शेतातील कामे पूर्ण करून घरी परत येत असताना त्यांना व कुटुंबियांना भर दुपारी अचानक बिबट्याचे दर्शन झाले. भितीपोटी कुटूंबियांनी तेथून पळ काढत गाव जवळ केले. याची माहोती ग्रामस्थांनी का विगाला दिल्यानंतर ताबडतोब वन विभागाची टीमघटनास्थळी यासंदर्भात अधिक तपास केला असता



बिबट्याच्या पायाचे ठसे घटनास्थळी दिसून आले. यावेळी वन विभागामार्फत ग्रामस्थांच्या मागणीनुसार या क्षेत्रात गस्त वाढवून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा व ट्रॅक कॅमेराही लावण्यात आला आहे. शिरजगाव येथून काही अंतरावरच असलेल्या कोळवन येथे आज भर दुपारी बिचट्या आढळून आल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.तर रघुनाथपूर, जवळपासच्या क्षेत्रात वारंवार बिबट्या आढळून देखील वन विभागाकडून उपाययोजना होत नसल्याने ग्रामस्थ संतप्त झाले आहेत. घटनास्थळी संजय देशमुख, तिवसा वनपाल महादेव गवई, डी.जी.जाभे, प्रशात कांबळे, पोलिस पाटील देवधरे उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात दत्त जयंती उत्साहात



**विदर्भ प्रजासत्ताकदि.५अमरावती** – स्थानिक रहाटगाव येथील स्वामी समर्थ सेवा केंद्रात दत्त जयंतीनिमित्त दत्त जन्मोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी हजारो भाविकांनी उपस्थित राहून दत्ता सोबतच स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. केंद्रात स्वामींचा जयघोष होऊन वातावरण भक्तीमय झाले होते. दर्शनानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.स्वामी समर्थ सेवा केंद्र, दिंडोरी प्रणित आरोग्य सेवा कॉलनी रहाटगाव अमरावती येथे या सप्ताह दरम्यान ग्रामदेवता, निमंत्रण, मंडल स्थापना, अग्निस्थापना, स्थापित देवता, हवन, नित्य स्वाहाकार, गणेश याग, दत्त जयंती आदी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी १२.३० वाजता स्वामींचा जयघोष करण्यात आला. यावेळी डॉ. कृष्णराव बोरखडे. निर्मलाबोरखडे, स्वाती बोरखडे, माजी नगरसेविका सुरेखाताई लुंगारे, दिगांबर लुंगारे, नयनाताई गावंडे, सुमन डॉगलवार, रत्नमाला सगणे, सुनिता अंबाडकर, रमेश अंबाडकर, दिनकरराव पळसोदकर, मधुकरराव सुरंदसे, एन. एम. देशमुख, दीपकराव देशमुख, चंद्रकांत मेहरे,सह परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते.

# उद्धव ठाकरे शोलेतले जेलर, राज ठाकरे नाना पाटेकर: अमृता फडणवीस यांची टोलेबाजी

## उद्धव यांच्या पलटीचा अंदाज होता असा केला दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ मुंबई** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी एका मराठी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे व इतर नेत्यांना विविध उपमा दिल्यात. त्यात त्यांनी उद्धव यांना शोले चित्रपटातील जेलरची, तर राज ठाकरे यांना नाना पाटेकरांची उपमा दिली आहे. एवढेच नाही तर त्यांनी २०१९ मध्ये अस्तित्वात आलेल्या महाविकास आघाडीचा आपल्याला यापूर्वीच अंदाज आला होता व त्याची चर्चा आपण फडणवीस यांच्यासोबत केल्याचाही दावा त्यांनी केला आहे.

अमृता फडणवीस आपल्या मुलाखतीत महाविकास आघाडी अस्तित्वात येण्याच्या घटनाक्रमावर भाष्य करताना म्हणाल्या, मी देवेंद्र फडणवीस यांना कधीही राजकीय सल्ला देत नाही. पण कधीकधी माझे टोले खरेही होतात. २०१९ च्या निवडणुकीनंतर राज्यात काही समीकरणे घडली होती. भाजपला १०५ जागा मिळाल्या होत्या. शिवसेनेलाही एवढ्या जागा मिळाल्या की, ते दोन्ही काँग्रेससोबत गेले असते तर त्यांची सत्ता सहज आली असती. अखेर तो प्रयोग झालाच. मी निवडणुकीच्या अगोदरच देवेंद्र यांना सांगत होते की, तुमच्या दोन पक्षांची नाही, पण तीन पक्षांची चांगल्या जागा आल्या.

शिवसेना काँग्रेस व राष्ट्रवादीसोबत गेली तर काय? मी हा प्रश्न निवडणुकीच्या अगोदर देवेंद्र यांना विचारला होता. कारण, माझ्या मनात तशी शंका आली होती. त्यावर देवेंद्र यांनी मला ठामपणे सांगितले होते की,



असे काही होईल असे वाटत नाही. कारण, उद्धव ठाकरे माझ्या जवळचे आहेत. त्यामुळे आपल्याशी धोका होईयल असे मला वाटत नाही. पण मी माझी शंका बोलून दाखवली होती.

**पवार, ठाकरे बंधूंविषयी काय म्हणाल्या?–** अमृता यांनी यावेळी उद्धव ठाकरे शोले चित्रपटातील जेलरसारखे, राज ठाकरे काहीसे नाना पाटेकरांसारखे वाटत असल्याचेही मत व्यक्त केले. उद्धव ठाकरे यांची गत शोलेतल्या जेलरसारखी झाली आहे. याऊलट राज ठाकरे खूप आक्रमक आहेत. मला ते नाना पाटेकर ब्रँड वाटतात. शरद पवारांविषयी मला एक गाणे आठवते. ते म्हणजे, अरे दिवानो मुझे पहचानो, कहाँ से आया मैं हूँ कौन? मै हूँ डॉन... मैं हूँ डॉन. एकनाथ शिंदे हे धर्मवीर चित्रपटातील शिंदेंसारखेच आहेत. अजित पवारांविषयी मी एवढेच म्हणेन की, दुनिया हसीनो का मेला, मेले मे ये दिल अकेला, असे अमृता म्हणाल्या.

**सुप्रिया सुळेंना टोला, फडणवीसांचा कौतुक**

अमृता यांनी यावेळी खासदार सुप्रिया सुळे यांना स्क्रिप्ट् रायटर होण्याचाही सल्ला दिला. सुप्रिया सुळे चांगल्या स्क्रिप्ट रायटर होऊ शकतात. त्या स्वतः चित्रपट लिहू शकतात. दिग्दर्शित करू शकतात. त्याच एकदा म्हणाल्या होत्या की, एक अकेला देवेंद्र क्या कर सकता है? त्यांचा डायलॉग व्हायरलही झाला होता. त्यामुळे त्यांनी स्क्रिप्ट रायटर व्हावे. याऊलट देवेंद्र फडणवीस मला नायक चित्रपटातील अनिल कपूरसारखे वाटतात. ते कुणाच्याही दबावाखाली काम करत नाहीत. त्यांच्यात प्रचंड

# वादग्रस्त जनसुरक्षा कायदा रखडला, केंद्राकडून छाननी सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांवर आळा घालण्यासाठी महायुती सरकारने जनसुरक्षा विधेयक पावसाळी अधिवेशनात मंजूर केले असले तरी हे विधेयक राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे विचारार्थ पाठविल्याने त्याचे अद्यापही कायद्यात रुपांतर होऊ शकलेले नाही. राज्य विधिमंडळाने मंजूर केलेल्या विधेयकावर केंद्रीय गृहमंत्रालयात अजूनही छाननीच सुरू आहे.

जनसुरक्षा कायदा हा राज्यात राजकीयदृष्ट्या वादग्रस्त ठरला होता. या कायद्याच्या माध्यमातून राजकीय विरोधकांची मुस्कटदाबी करण्याचा सरकारचा प्रयत्न असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. विरोधकांच्या आरोपांनंतर हे विधेयक संयुक्त समितीकडे चर्चेसाठी पाठविण्यात आले होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने विविध नागरी संघटना, स्वयंसेवी संघटनांच्या प्रतिनिधींशी या कायद्याबाबत चर्चा केली होती. संयुक्त समितीने जनसुरक्षा कायद्यातील काही तरतुदी सौम्य केल्या होत्या. मूळ विधेयकात व्यक्ती आणि संघटना यांच्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध अशी तरतूद होती. व्यक्ती म्हणजे कोणाच्याही विरोधात कारवाई केली जाऊ शकते, अशी भीती व्यक्त करण्यात येत होती. विरोधकांच्या आक्षेपानंतर कडव्या डाव्या विचारसणीच्या संघटना असा बदल करण्यात आला होता. त्यानंतरच विरोधकांनी या विधेयकाला पाठिंबा दिला होता.

जनसुरक्षा विधेयकाला विधानसभेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष वगळता सर्वांनीच पाठिंबा दिला होता. काँग्रेस, शिवसेनेच्या भूमिकेवर नागरी संघटनांनी टीका करताच विधान परिषदेत विरोधकांनी विधेयकाला विरोध करीत सभात्याग केला होता. कडव्या डाव्या विचारसणीच्या संघटना आणि शहरी नक्षलवादाला आळा घालण्यासाठी हा कायदा करण्यात येत असल्याचे सरकारच्या वतीने स्पष्ट करण्यात आले होते. या कायद्याचा गैरवापर केला जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली होती.

विधेयक मंजूर झाल्यावर हा कायदा राज्यात लगेचच लागू करण्याची सरकारची योजना होती. परंतु हे विधेयक स्वाक्षरीसाठी आल्यावर तत्कालीन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी ते विचारार्थ राष्ट्रपतींकडे पाठविले होते. राज्याच्या विधेयकातील काही तरतुदी या केंद्राच्या कायद्याच्या विरोधी नसाव्यात या उद्देशाने राज्यपालांनी हे विधेयक विचारार्थ राष्ट्रपतींकडे पाठविले होते, असे सांगण्यात येते.

# पुसला टोलनाक्याने नागरिक त्रस्त; खराब रस्ता वाढलेला टोल आणि शेतकऱ्यांचा असंतोष उफाळला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ वरुड**

वरुड-पांढुर्णा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ केवर पुसला येथील टोलनाका सुरू झाल्यानंतर परिसरातील नागरिक, शेतकरी आणि कमी अंतरावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. नुकतेच नोव्हेंबर महिन्यात सुरू झालेल्या या टोलनाक्यावर हलक्या चारचाकी वाहनांसाठी प्रति फेरी ७० रुपये, तर मासिक पास ३४० रुपये आकारला जात आहे. दैनंदिन शेतीकामासाठी किंवा अत्यावश्यक कारणांसाठी वारंवार रस्त्याचा वापर करणाऱ्या ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना हा आर्थिक भार असह्य ठरत आहे.

पुसला गावांतील नागरिकांना कोणतेही मोठे अंतर पार न करता फक्त स्थानिक कामासाठी रस्ता वापरावा लागला तरी पूर्ण टोल रक्कम भरावी लागत आहे. त्यामुळे शेतात ट्रॅक्टर किंवा चारचाकी घेऊन जायचे, तरी टोल द्यावा लागतो अशी नाराजी नागरिक व्यक्त करत आहेत. पर्यटकांनाही समान शुल्क आकारले जात असल्याने असंतोष अधिक वाढला आहे.

याहूनही त्रासदायक बाब म्हणजे संबंधित महामार्गावर मोठमोठे खड्डे, तुटलेली डांबरीकरणाची कामे, आणि वारंवार होणारे अपघात हे चित्र अजूनही कायम आहे. नागरिकांचा प्रश्न असा आहे की– रस्ता दुरुस्त नाही, सुरक्षित नाही; मग टोल कशासाठी ?स्थानिकांच्या मते, या टोलनाक्याबाबत राजकारण्यांसह आजी-माजी लोकप्रतिनिधींनी जाणूनबुजून दुर्लक्ष केले असून शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या अडचणींकडे कोणीही लक्ष देत नाही.पुसला परिसरात सध्या टोलनाका हटविणे, स्थानिक नागरिकांना दिलासा देणारा मासिक पास कमी दरात उपलब्ध करून देणे, तसेच रस्ता तातडीने दर्जात्मक बनवणे या मागण्या जोर धरत आहेत. टोल सुरू झाला असला तरी मूलभूत सुविधा आणि रस्त्याची गुणवत्ता सुधारली नाही, यामुळे नागरिकांचा रोष दिवसेंदिवस तीव्र होत चालला आहे.

# प्रबोधन विद्यालय दर्यापूर चे विद्यार्थी विज्ञान मंथन परीक्षेमध्ये सुयश

## दोन विद्यार्थी राज्यस्तरावर त्याची निवड




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५दर्यापूर**

विद्यार्थी विज्ञान मंथन नागपुरद्वारे आयोजित परीक्षेमध्ये नुकत्याच लागलेल्या निकालामध्ये दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालयाच्या कु.रोहिणी अनिल राठोड व कु. अनुष्का रवींद्र गाडगे (इयत्ता दहावी)या दोन्ही विद्यार्थ्यांनी लेवल दोन यशस्वी करून राज्यस्तरावर विद्यालयाचे नाव उंचावले आहे .विज्ञान विषयासंदर्भात काठीण्य पातळीवर प्रतिष्ठेची मानल्या जाणार्या या परीक्षेमध्ये विद्यालयातील इयत्ता नववी व दहावीच्या एकूण ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामधील वीस विद्यार्थी हे जिल्हास्तरावर पात्र झाले होते. राज्यस्तरीय परीक्षेमध्ये विदर्भातून एकूण ४५०० विद्यार्थ्यांमधून विद्यालयाची कु.रोहिणी अनिल राठोड यहिने ८०पैकी ७१तर कु.अनुष्का रवींद्र गाडे हिने ७० गुणांक प्राप्त करून विद्यालयाला राज्यस्तरावर हा बहुमान प्राप्त करून दिला. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी विज्ञान शिक्षक श्री मनोज राठी, आई-वडील,वर्गशिक्षक तसेच शिक्षकवृंद यांना दिले. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिकदृष्टिकोन,जिज्ञासूवृत्ती, नवोपक्रमशीलता रुजवण्यासाठी विज्ञान शिक्षक वर्षभर विविध उपक्रम घेतात असे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य श्री नरेंद्रजी गोंडाने यांनी याप्रसंगी केले. कार्यालयीन अधिकारी प्रतिभाताई संत, राजकुमार बावनकुळे, अरविंद हाडोळे,सतीश अघडते यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणार्या विज्ञान शिक्षकांचे कौतुक केले. विदर्भ समन्वयक सो माधुरी डेहेकर मॅडम यांनीसुद्धा दोन्ही विद्यार्थिनींची तयारी व जिद्दीची प्रशंशा केली. विदर्भ प्रबोधन मंडळ अध्यक्ष व विश्वस्त मंडळ यांनी अभिनंदन केले. या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# १५ रेल्वे स्थानकांवर ४९ 'एटीव्हीएम'ची तिकीट सुविधा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

प्रवाशांना तिकिटासाठी रांगेत न थांबता जलद आणि सुलभ पद्धतीने तिकीट मिळावे, डिजिटल तिकीटिंगला प्रोत्साहन मिळावे आणि सेल्फ-टिकिटिंग वाढीस लागावी या उद्देशाने रेल्वे प्रशासनाकडून विविध स्थानकांवर ऑटोमॅटिक टिकीट व्हेंडिंग मशीन (एटीव्हीएम) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच क्यूआर कोड आणि यूपीआय आयडीद्वारे डिजिटल पेमेंटची सुविधाही अधिक सक्षम करण्यात आली आहे.

भुसावळ विभागात प्रवाशांच्या सुविधा लक्षात घेऊन एकूण १५ स्थानकांवर ४९ एटीव्हीएम बसवण्यात आले आहेत. या मशीनचा सहज उपयोग करता यावा यासाठी १२ प्रशिक्षित सहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली असून हे सहाय्यक स्थानक परिसरात प्रवाशांना एटीव्हीएमद्वारे तिकीट कसे काढायचे याबाबत मार्गदर्शन करत आहेत. भुसावळ विभागातील देवळाली, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, अमरावती, ब-हाणपूर आणि खंडवा या प्रमुख स्थानकांवर एटीव्हीएमची आली आहे प्रवाशांना ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात पेमेंटची माहिती देण्यात येत आहे.

# धामणगावात महावितरण विरोधात शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन; विस्कळीत वीजपुरवठ्यावर संताप अनावर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५धामणगाव रेल्वे**

शेतीसाठी नियमित, योग्य आणि वेळेत वीजपुरवठा न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा संताप अखेर रस्त्यावर आला असून, जुना धामणगाव येथील महावितरण कार्यालयासमोर गुरुवारी शेतकऱ्यांनी ठिय्या आंदोलनाला बसत तीव्र निषेध नोंदवला. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा परिषदेचे माजी सदस्य मोहन सिंघवी यांनी केले.

गेल्या काही दिवसांपासून शेतीसाठी आवश्यक असलेल्या वीजपुरवठ्यात वारंवार खंड पडत असून, रात्रीच्या बॅलेंसुद्धा पुरवठा ठप्प राहतो आहे. यामुळे पिकांच्या वाढीवर गंभीर परिणाम होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. विशेष म्हणजे, एका शासकीय बीज कंत्राटदाराला सतत २४ तास वीजपुरवठा मिळतो, असा आरोप शेतकऱ्यांनी आंदोलनादरम्यान केला, तर सामान्य शेतकऱ्यांना मात्र वारंवार खंडित होणाऱ्या पुरवठ्यामुळे मानसिक आणि आर्थिक त्रास सोसावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या रब्बी हंगाम सुरू असून मोठ्या प्रमाणात गहू व हरभरा पेरणीची कामे सुरु आहेत. मात्र महावितरणकडून जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार वीजपुरवठा न मिळाल्याने शेतकरी व मजूर हात बांधून बसण्याची वेळ आली आहे. पेरणीचे काम ठप्प पडल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होऊ शकतो, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला.

आंदोलनाची दखल घेत महावितरणचे कनिष्ठ अभियंता आशिष पवार यांनी शेतकऱ्यांशी चर्चा करून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. तसेच अतिरिक्त भार कमी करण्यासाठी नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या ठिय्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून पुढील काही दिवसांत महावितरण कोणती कार्यवाही करते, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. आंदोलनावेळी मोहन सिंघवी, राजेंद्र लाहोटी, नरेंद्र व्यवहारे, नरेंद्र बाले, प्रमोद बाले, मंगेश डाले, विनोद कापडे, नंदकिशोर गैंगे, घनश्याम लाहोटी तसेच मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# तळेगाव मध्ये दत्त जन्म व पारायण सोहळा उत्साहात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५तळेगाव ठाकूर**

अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे दत्त जयंती निमित्य दत्त जन्मोस्तव व पारायण सोहळा मोठया थाटामाटात साजरा करण्यात आला.तळेगाव मध्ये दि.१ डिसेंबर २०२५ ते ५ डिसेंबर २०२५ ह्या कालावधी मध्ये हा सोहळा पार पडणार आहेत.दि.३ डिसेंबर २०२५ ला सामूहिक पारायण सोहळा आयोजित करण्यात आला.या सोहळ्या मध्ये एकूण २८ महिलांनी सहभाग घेऊन ५२ अध्याय चे वाचन करण्यात आले. आज दि.४ डिसेंबर २०२५ रोजी लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला होता.या लहान चिमुकल्या मुलांना बक्षीस सुद्धा वाटण्यात आले.नंतर दत्त जन्मोस्तव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.यावेळी पाळणा सजवण्यात आला होता. नंतर भजन आणि आरती करण्यात आली.

# २ किलो गांजाची वाहतूक करणारा जेरबंद



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

गांजाची वाहतूक करणार्या एका युवकाला गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी रात्री ७ वाजताच्या सुमारास अटक करून त्याच्याकडून २ किलो ८०० ग्रॅम गांजा जप्त केला. शेख अफजल शेख असगर (वय ४०, रा. छायानगर) असे अटकेतील युवकाचे नाव आहे.गुन्हे शाखेचे पथक गुरुवारी रात्री नागपुरी गेट परिसरात गस्तीवर असताना एक युवक दुचाकीने गांजा घेऊनजात असल्याची माहिती मिळताच पथकाने असोरिया पेट्रोल पंपासमोर सापळा रचला. युवक दुचाकीवरून येताच त्याला ताब्यात घेऊन पाहणी केली असता त्याच्याजवळ २ किलो ८०० ग्रॅम गांजा मिळून आला. पोलिसांनी त्याला अटक करून नागपुरी गेट पोलिसांच्या ताब्यात दिले.

# नादुरुस्त बसमुळे हुकला लग्नमुहूर्त, एसटीच्या अधिकाऱ्यांना ५० हजारांचा दंड

## ग्राहक मंचाचा निर्णय; मन:स्ताप झालेल्या वर पक्षाने केली होती तक्रार


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नाशिक**

लग्न समारंभाकरता प्रासंगिक करारकेलेल्या एस.टी. बसला चुकीचा मार्ग आणि पत्ता दिल्याने बस पत्त्यावर उशिरा आली. मात्र, बस नादुरुस्त झाल्याने लग्न उशिरा लागल्याने वऱ्हाडाला आणि वराच्या आई-वडिलांना मन:स्ताप सहनकरावा लागला. वरपक्षाने नांदगावचे आगार व्यवस्थापक, विभागनियंत्रकाच्या विरोधात ग्राहक न्यायमंचामध्ये तक्रार केली होती. मंचाने एस.टी. महामंडळाच्या दोन्ही अधिकाऱ्यांना ५० हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले.

नांदगाव येथील तक्रारदाराच्या मुलाच्या लग्नाचे वऱ्हाड जाण्या-येण्यासाठी एस.टी.महामंडळाकडे प्रासंगिक कराराने २२ हजार रुपये मंडळाचे रोखपालयांच्याकडे देऊन टू बाय टू एस.टी.बस ठरवली होती. आगार व्यवस्थापक, नियंत्रकाने चुकीचामार्ग आणि पत्ता दिल्याने बस उशिरा आली. लग्नाच्या ठिकाणी मार्गस्थझाल्यानंतर बस ५० किमी अंतरावर अचानक बंद पडली. तक्रारदाराने विभाग नियंत्रकाशी संपर्क साधला असता, 'अर्ध्या तासात बस उपलब्धकरून देतो,' असे सांगितले. मात्र, बस सुमारे अडीच तास उशिरा आली. यामुळे वऱ्हाडाचे हाल झाले. रस्त्यावर ताटकळत बसावे लागले.बस लग्नस्थळी तीन तास उशिरा पोहोचल्याने लग्नाला उशीर झाला. त्यामुळे वधूपक्षाकडील मंडळीही नाराज झाली. शारीरिक, मानसिकत्रास झाल्याने तक्रारदाराने ५ लाख रुपयांची नुकसानभरपाई मिळावीयासाठी न्याय मंचात तक्रार केली होती.


### चुकीचा पत्ता दिल्याने उशिरा पोहोचली बस

सतीश बिडवे (रा. नांदगाव) यांच्या मुलाचा २३ फेब्रुवारी २०२३ रोजी फुलंब्री (जिल्हा छत्रपतीसंभाजीनगर) येथे विवाह होता. एसटी बसच्या प्रासंगिक करारासाठी १५ फेब्रुवारी रोजी रोखपाल कारकुनी यांच्याकडे २२ हजार रुपयेही जमा केले होते. बसचालकाला चुकीचा पत्ता दिल्याने बस पत्त्यावर न येता नांदगावहून नस्तनपूरला गेल्याने उशिरा पोहोचली. बस आल्यानंतर ५० किमी अंतरावर ती बंद पडली. निवारा नसल्याने वऱ्हाडी मंडळीचे हाल झाले.



# मारेगावजवळ ट्रक आणि बसचा भीषण अपघात; दोन ठार, आठ जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५यवतमाळ**

वणी - यवतमाळ राज्य मार्गावर मारेगाव तालुक्यातील जळका फाट्याजवळ गुरुवारी रात्री साडेआठच्या सुमारास भीषण अपघात झाला. यात दोन प्रवासी जागीच ठार झाले तर आठ जण गंभीर आणि दोघे किरकोळ जखमी झाले. अपघातात बसचे अक्षरशः दोन तुकडे झाले असून समोरचा भाग पूर्णपणे चिरडला गेला.

नवनाथ शिवाजी काचे (३०, रा. अंकुलगा, जि लातूर), भीमराव मरस्कोल्हे (५०, रा. मंगी, ता केळापूर) अशी मृतांची नावे आहेत. शूभम ढोंबरे, रोहित योकनकर रा. मोहदा, सचिन झिलपे, रा, बोटोनी, अमोल टेकसे, रा. मेटीखेडा, संतोष खिलके, रा. किंगा, प्रसाद चिंचोळकर रा. मेटीखेडा, विमल मरस्कोल्हे रा. मंगी, दुर्गा ठाकरे, रा. ब्रम्हपूरी, नरेंद्र मडावी रा. मंगी. भीमराव मडावी रा. मंगी अशी गंभीर जखमींची नावे असून, त्यांना उपचारार्थ यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले आहे. इतर दोन किरकोळ जखमींना पांढरकवडा येथील रुग्णालयात भरती केले आहे.वणी येथून (एमएच ४० वाय ५७८२) बस यवतमाळला जात होती. तर एमएच २८ बीबी ५८२७ क्रमांकाचा ट्रक वणीकडे येत होता. जळका फाटा येथे दोन्ही वाहनांमध्ये जोरदार धडक बसली. या अपघातात बस एका बाजूने पूर्णतः कापल्या गेली. अपघात घडताच चालक बेशुद्ध पडल्याने बस २०० मीटर लांब जात रस्त्याच्या खाली उतरून थांबली. यावेळी वणीचे आमदार संजय देरकर जळका येथे सार्वजनिक कार्यक्रमासाठी आले असता, अपघाताची माहित मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळ गाठले.

सर्व जखमी व मृतांना गावकऱ्यांच्या सहकार्याने करंजी व पांढरकवडा येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. बसमध्ये १५ प्रवाशांसह चालक, वाहक होते. यात नवनाथ काचे, भीमराव मरस्कोल्हे हे दोन प्रवासी जागीच ठार झाले तर इतर प्रवासी जखमी झाले. दरम्यान प्रल्हाद अरविंद चिचोळकर यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी यवतमाळ येथे शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले आहे. या अपघाताची पोलिसांनी नोंद घेतली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून ट्रक चालकाचा ताबा घेऊन पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# आरोग्य-आदिवासी विकासासह तीन विभागांचे २६ अधिकारी मेळघाट दौऱ्यावर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्य शासनाच्या तीन विभागांच्या प्रधान सचिवांसह सहा विभांगाच्या २७अधिकाऱ्यांचा ताफा शुक्रवारी सकाळपासून मेळघाटात दाखल होत आहे. सहा पथकाद्वारे वरिष्ठ अधिकारी विविध सोयी, सुविधांचा आढावा घेऊन फ्रेंडवर्कर कर्मचाऱ्यांशी चर्चा करणार आहे. या पथकात आरोग्य, आदिवासी विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महिला व बालकल्याण विभाग, वित्त तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

मेळघाटात शासनाच्या योजनांची मुळात अंमलबजावणी होत नाही. तेथे कोट्यावधी रुपये खर्च करूनहीसुविधांचा अभाव कायम असल्याची याचिक रविंद्र कोल्हे, बंडू साने, राजेंद्र बर्मा व डॉ कूलपे यांनी उच्चन्यायालयात दाखल केली होती. न्यायालयाच्या आदेशावरुन राज्य शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मेळघाटात प्रत्यक्ष भेट देऊन तेथील सोयी सुविधांचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्याने मेळघाटातील आदिवासी भागातील आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा, महिला व बालविकास आणि इतर मूलभूत सुविधा तपासण्यासाठी राज्यातील विविध विभागांचे प्रधान सचिव, आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी शुक्रवार ५ डिसेंबर रोजी मेळघाट दौरयावर येत आहेत. या दौऱ्यात सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. विपून विनायक, आदीवासी विकास विभागाचे प्रधान सचिव विजय वाघमारे, महिला व बालकल्याण विभागाचे प्रधान सचिव अनुपकुमार यादव यांच्यासह राज्य शासनातील प्रमुख २६ अधिकाऱ्यांचा ताफा मेळघाटात दाखल होत आहे. या अधिकाऱ्यांचे सहा पथक तयार करण्यात आले असून सकाळी ९ वाजतापासून एकाचवेळी उच्चस्तरीस अधिकारी मेळघाट दाखल होणार आहे. दिवसभर सदर अधिकारी विविध सोयी, सुविधांचा आढावा घेऊन ग्राऊंड रिपोर्ट तयार करतील. त्यानंतर शनिवारी या अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली आहे. या दौऱ्यामुळे स्थानिक अधिकाऱ्यांची चांगलीच कसरत होणार आहे. जिल्ह्यात पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात अधिकारी दाखल होत व असल्याने प्रशासनसह मेळघाटात या दौऱ्याची उत्सुकता लागली आहे.

# खैरी गावातील मधील थरारक घटना
# चारित्र्यावर संशय, पत्नीची काठीने वार करून हत्या


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५आसेगाव पूर्णा,**

चारीत्र्यावर संशय घेवून पतीने पत्नीची काठीने वार करून हत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारला खैरी गावात उघड झाल्याने खळबळ उडाली. आसेगाव पूर्णा पोलिसांनी पळून जाण्याचा प्रयत्न करणारा हत्यारा पती जानराव उर्फ ज्ञान्या भोसले (३५) यास अटक केली. त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हाही दाखल करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, अचलपूर तहसीलमधील मौजा खैरी येथील पारधी बेडा परिसरातील रहिवासी जानराव उर्फ ज्ञान्या भोसले (३५) हा त्याची पत्नी सबना जानराव भोसले (३२) हिच्या चारित्र्यावर सतत संशय घेत असे. यामुळे या जोडप्यात वारंवार वाद आणि भांडणेहोतवतोमारहाण करीत असत. स्थानिक नागरिक जेव्हा जेव्हा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करत असत तेव्हा आरोपी शिवीगाळ आणि मारहाण करत होता. त्याच्या या स्वभावामुळे, कौटुंबिक वादात कोणीही हस्तक्षेप करत नव्हते. शिवाय, आरोपीने त्याच्या सासरच्या लोकांना मारहाण केली आणि त्यांना घराबाहेर हाकलून लावले, त्यांना भीक मागण्यास भाग पाडले.

बुधवारी रात्री उशिरा, रात्री १० ते १२ वाजेच्या दरम्यान, आरोपीने पुन्हा पत्नी सबानाशी वाद घातला आणि रागाच्या भरात बांबूच्या काठीने तिच्या चेहऱ्यावर, छातीवर, पाठीवर आणि मांडीवर बांबूच्या काठीने वार केले. गंभीर मारहाणीमुळे सबानाचा जागीच मृत्यू झाला. त्यांना लहान मुले देखील आहेत. हत्येची माहिती मिळताच, पोलीस तात्काळ घटनास्थळी पोहोचले.फॉरेन्सिक व्हॅन आणि फिंगरप्रिंट तज्ज्ञांना तात्काळ घटनास्थळी बोलावण्यात आले आणि आरोपीविरुद्ध सर्व पुरावे गोळा करण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी, आरोपी जानराव पळून जाण्याच्या तयारीत होता, परंतु पोलीस पाटील धनश्री दीपक काळे यांच्या मदतीने आसेगाव पोलिसांनी त्याला अटक केली. त्याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार सूरज तेलगोटे, सूरज सुसातकर, इझहार गणी, नागराज स्वामी, पंकजगावंडे, शोएब देशमुख, संभाजीटिपरे आणि राहुल चारथळ यांनी केली.

# अचलपूरच्या 'त्या' दोन प्रभागात उमेदवारांना नामनिर्देशनपत्र मागे घेता येणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अचलपूर**

अचलपूर नगरपालिकेतील प्रभाग क्रमांक १० 'अ' व १९ 'ब' येथे न्यायालयीन प्रकरणामुळे या दोन प्रभागांतील मतदान स्थगित ठेवावे लागले होते. या दोन्ही जागांसाठी उमेदवारांना आपले उमेदवारी अर्ज मागे घेता येईल. परंतु नवीन नामनिर्देशनपत्रे दाखल करता येणार नाहीत. ११ डिसेंबरला चिन्ह वाटप तर २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.

अचलपूर नगरपरिषद प्रभाग क्रमांक १० 'अ' हा अनुसूचित जाती (सर्वसाधारण) प्रवर्गासाठी राखीव आहे. या प्रभागात एकूण ९ उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रे दाखल केली होती. विशाल भारत थोरात यांनी कल्पना पंजाब गवई व शंतनु तेलमोरे यांच्या नामनिर्देशनांवर आक्षेप घेतला होता. मात्र न्यायालयाने हे आक्षेप फेटाळत २३ नोव्हेंबर रोजी आदेश दिला, प्रभाग क्रमांक १९ 'ब' हा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव आहे. येथे ८ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. शिवसेनेच्या वतीने अर्थव संजय देंडव यांना 'ब' गटासाठी एबी फॉर्म देण्यात आला होता; शिवसेनेच्या उमेदवार अनिता कुऱ्हेकर यांनीही 'ब' गटातच अर्ज दाखल केला. मात्र एबी फॉर्म 'अ' तर गटाचा लावण्यात आल्याने त्यांनी न्यायालयात दाद मागितली होती. त्यांची मागणीही न्यायालयाने फेटाळली. या दोन्ही प्रभागांतील न्यायालयीन प्रकरणांमुळे निवडणूक पुढे ढकलण्यात आली. निवडणूक आयोगाच्या मूळ कार्यक्रमानुसार अचलपूर पालिकेतील नगराध्यक्ष व ३९ नगरसेवकांची निवडणूक प्रक्रिया २ डिसेंबर रोजी पूर्ण झाली; मात्र प्रभाग क्रमांक १० 'अ' व १९ 'ब' वगळण्यात आले होते. या दोन प्रभागांसाठी नव्यानेकार्यक्रम जाहीर करण्यात आला असून नवीन नामनिर्देशनपत्रे दाखल करता येणार नाहीत. मात्र ५ ते १० डिसेंबर दरम्यान अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. ११ डिसेंबर रोजी चिन्हांसह अंतिम यादी प्रसिद्ध होईल आणि २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.प्रभाग क्रमांक १९ 'ब' (शहीद भगतसिंह) मध्ये भाजपचे राजू तायडे, शिवसेना अर्थव दंडव, राष्ट्रवादी फिरोज खां सुलतान खां, काँग्रेस मोबीन उर्फ मो. उस्मान, इतर अतहर अहमद खान (शेर खान), अनिल माहुरे, मो. सलमान मो. सलीम, वसीम खान रशीद खान तर, प्रभाग क्रमांक १० 'अ' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) मधून भाजपचे ऋषिकांत घन, काँग्रेस विशाल भारत थोरात, शिवसेना भारत प्रभुदास वानखडे, कल्पना पंजाब गवई, शंतनु तेलमोरे, चंद्रेश कांतीलाल बहोरीया, आकाश पारवे, बाबाराव वानखडे, अतुल सरोदे यांनी उमेदवारी दाखल केली आहे. ११ डिसेंबरला उमेदवारांची अंतिम यादी जाहीर झाल्यानंतर या दोन्ही प्रभागांतील प्रचाराला वेग येण्याची शक्यता आहे.

# विद्यापीठाच्या ज्युनियर हॅकेथॉन-२०२५ मध्ये विध्यार्थ्यांचा कल्पकतेला पंख-कुलगुरू

## शालेय विद्यार्थ्यांचा भरभरुन प्रतिसादविद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध विषयावरील संशोधन मॉडेल्सचे प्रदर्शन






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

शालेय वयातच विद्यार्थ्यांनी कल्पनाशक्तीपलिकडे तयार केलेल्या विविध विषयांवरील संशोधन मॉडेल्स पाहून विद्यार्थ्यांच्या कल्पनांना पंख फुटले असा एकंदरीत सूर प्रदर्शनीमधील मॉडेल्स पाहून निघाला. त्यामुळे शालेय विद्यार्थी भविष्यात निश्चितच उंच भरारी घेतील, हे निश्चित. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पुढाकारातून शालेय विद्यार्थ्यांसाठी 'ज्युनियर हॅकेथॉन-२०२५' चे आयोजन करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेला भरभरुन प्रतिसाद देत आपापल्या कल्पनांनी तयार केलेली विविध विषयांवरील संशोधन मॉडेल्स यावेळी सादर करण्यात आलीत. प्रदर्शनीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते झाले. यावेळी महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. सौम्या शर्मा (चांडक) प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, डॉ. सौम्या शर्मा (चांडक) यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेली संशोधन मॉडेल्स पाहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांच्या मॉडेल्सची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी सुध्दा संशोधन मॉडेल्स कशी आणि किती फायदेशीर आहेत, त्यांच्या मॉडेल्सचे उपयोग यावेळी मान्यवरांना सांगितले. विद्यापीठ अंतर्गत असलेल्या इन्क्युबेशन सेंटर व मेधावाटिका स्टार्टअप यांच्या संयुक्त विद्यमाने ही ज्युनियर हॅकेथॉन-२०२५ स्पर्धा आयोजित करण्यात आली. त्यासाठी टेक्नॉलॉजी अॅन्ड डिजिटल इन्नोव्हेशन, एन्व्हार्यमेंट अॅन्ड सस्टेनबिलिटी, हेल्थ अॅन्ड बेलबिइंग, ओपन थिम असे विषय ठेवण्यात आले होते. इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली विविध विषयांवरील मॉडेल्स सादर केलीत. यावेळी इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, इन्क्युबेशन सेंटरचे सर्व अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

**अमरावतीत आय.टी. पार्क व्हावा-आयुक्त**

या कार्यक्रमारम्यान शहराच्या विकासाच्या दृष्टीने एक महत्वाची चर्चा झाली. मनपा आयुक्त सौम्या शर्मा (चांडक) यांनी अमरावतीत आय.टी. पार्क काळाची गरज असल्याचे सांगून शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना प्रगल्भ बनविणे गरजेचे आहे. त्यामुळे भविष्यात ते आपले उज्ज्वल जीवन घडवू शकतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सुध्दा आय.टी. पार्कसाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगून शासनाकडे सुध्दा याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याचे सांगितले. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर यांनीही यावेळी मनपा आयुक्त यांना उपक्रमांबाबतची माहिती दिली.

# आर्वी येथील बिडिओला अटक केल्याचा निषेध जिल्ह्यातील बिडिओ सामूहिक रजेवर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

आर्वी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीयांना मनरेगा योजनेतील कथित अपहार प्रकरणात अटक करण्यात आल्याने या घटनेच्या निषेधार्थ गुरुवार आणि शुक्रवारी दोन दिवस राजपत्रित अधिकाऱ्यांनी सामूहीक रजा आंदोलन पुकारले आहे. त्यामुळे या घटनेचा गुरुवारी निषेध व्यक्त करीत निवेदन देण्यात आले.

केवळ कंत्राटी कर्मचाऱ्याच्या जबाबांवर आणि व्यवहारात वापरलेल्या डीएससी चाउल्लेख या एकाच आधारावर गटविकास अधिकाऱ्यांना अटक करणे ही कायदेशीर वप्रक्रियात्मकदृष्ट्या चुकीची कारवाई आहे. महिला अधिकारी असूनहीआवश्यक ती सावधगिरी आणि प्राथमिक विभागीय चौकशी न करता अटक केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र विकाससेवाराजपत्रित अधिकारी संघटनेच्या नेतृत्वात अतिरिक्त सीईओंसह प्रकल्पसंचालक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी वजिल्ह्यातील गटविकास अधिकाऱ्यांनी रोष व्यक्त करीत दोन दिवस सामूहिक रजा आंदोलन केले. याबाबत संघटनेने विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले.या प्रकारामुळे राज्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांमध्ये गंभीर असुरक्षितता निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद आहे. आंदोलनात अतिरिक्त सीईओ विनय ठमके, प्रकल्प अधिकारी प्रिती देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुळकर्णी, बालासाहेब अन बायस, बाळासाहेब रायबोले, बिडीओ सुदर्शन तुपे, तुषार दांडगे, विनोद खेडकर, योगेशवानखडे, संजय खारकर सर्वच पंचायत समितीचे अधिकारी सहभागी झाले होते.

# शिक्षक-शिक्षकेत्तर संघटना धडकल्या जिल्हाधिकारी कार्यालयावर; जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

अमरावती-शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समिती ने दिले नोटीस नुसार मागण्यांची शासनाकडून सोडवणूक होत नसल्याने आज ५ डिसेंबर २०२५ रोजी राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक रजा घेऊन शाळा बंद आंदोलन केले आहे. या आंदोलनाचा भाग शाळा बंद करून कोणालाही वेठीस धरण्याचा नव्हता किंवा नाही; तर विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागण्यांच्या संबंधात शासनाने अनुकूल निर्णय घ्यावा हाच एकमेव उद्देश आहे.अशी माहीती सहभागी शिक्षक संघटना पदाधिकारी यांनी सांगीतले आहे. या आंदोलना मध्ये प्राथमिक शिक्षकांना ढएढ अनिवार्य करण्यासंबंधाने राज्य शासनाने शिक्षकांच्या संरक्षणार्थ भूमिका घेऊन न्याय द्यावा. ठढए -र्ली कलम - २३ मध्ये ढएढ बाबत सुधारणा करण्यासह छउढए च्या अधिसूचनेत दुरुस्ती होण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करून आवश्यक पावले तातडीने उचलण्यात यावीत. ढएढ अनिवार्यतेच्या नावाखाली थांबविलेल्या पदोन्नती प्रक्रिया शीघ्र सुरु व्हावी. म. ना. से. नियम १९८२ व १९८४ अंतर्गत जुनी पेन्शन योजना पूर्ववत बहाल करावी. संचमान्यता शासन निर्णय दि. १५ मार्च २०२४ तसेच कमी पटसंख्येच्या नावाखाली शाळा बंद (समायोजित) करण्याचे धोरण रद्द करून बालकांच्या शिक्षणाची हेळसांड थांबवावी. शिक्षण सेवक योजना बंद करून पूर्ण वेतनावर नियमित शिक्षक भरती पूर्वलक्षी प्रभावाने सुरु करावी.सर्व विषय पदवीधर शिक्षकांना भेदभाव न करता पदवीधर वेतनश्रेणी लागू करावी. राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बंद असलेली पदभरती तात्काळ सुरु करावी. दैनंदिन अध्यापन कार्य प्रभावित करणारी शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनास अडसर ठरणारी इडज सह ऑनलाईन / ऑफलाईन कामे बंद करावी. पूर्वाश्रमीच्या वस्तीशाळा शिक्षकांच्या सेवा प्रथम नियुक्तीपासून पेन्शनसह सर्व प्रयोजनासाठी ग्राह्य धराव्यात. ग्रामीण भागात सेवारत जिल्हा परिषदेच्या शिक्षकांसाठी मुख्यालयी शासनाने निवासस्थाने बांधून द्यावीत. तोपर्यंत मुख्यालयी राहण्यासंबंधाने शिस्तभंगाची नावाखाली सक्ती करू नये. नगर पालिका, महानगर पालिका प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या वेतनासाठी स्वतंत्र वेतन पथक गठीत करून वेतन व सर्व थकबाकीचा प्रश्न सोडवावा.आश्रमशाळांमध्ये कंत्राटी शिक्षक भरतीचे धोरण रद्द करावे. पेसा क्षेत्रात प्राथमिक शाळांमध्ये नियमित शिक्षकांची भरती होईपर्यंत कार्यरत कंत्राटी शिक्षकांच्या सेवा कायम ठेवाव्यात. शिक्षकांच्या सेवाविषयक समस्या व शाळांतील प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मंत्रालय स्तरावर संघटनांच्या किमान त्रैमासिक नियमित बैठक आयोजित कराव्यात. आंतरजिल्हा बदलीचा पुढील टप्पा तात्काळ सुरू करण्यात यावा तसेच बदलीसाठीच्या अनिवार्य सेवा कालावधीची अट शिथिल करावी या प्रश्नांच्या संबंधाने शासनाची भूमिका अधिक सकारात्मक असण्याची गरज आहे. परंतु शासन स्तरावर अनुकूल असा प्रतिसाद दिसून येत नाही. वारंवार संघटनांच्या माध्यमातून पत्र व्यवहार करून, भेटी घेऊनही दुर्लक्ष कायम आहे. स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविले जात नाही. शाळांचे अस्तित्व धोक्यात येत असतानाही त्याबाबत अनुकूल असे निर्णय होत नाही. शिक्षकांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे भविष्य अंधःकारात ढकलल्या जाणाऱ्या ढएढ सारख्या प्रश्नावर शिक्षकांना न्याय देण्याच्या बाबतीत कमालीचे दुर्लक्ष होत असल्याने राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संतप्त भावना आहेत.

त्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर संघटना समन्वय समिती ने आज शुक्रवारी दि. ५ डिसेंबर २०२५ रोजी राज्यातील व जिल्हातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि संस्था चालक संघटनांच्या उत्स्फूर्त सहभागाने राज्यातील शाळा बंद ठेवण्याचे आंदोलन केले आहे.शासनाने सद्यस्थितीचा व या आंदोलनास मिळालेला प्रतिसाद बघता न्यायसंगत मागण्यांच्या सोडवणुकीसाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करावी अन्यथा अधिक तीव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही.अशा इशारा प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार,शैलेन्द्र दहातोंडे,जिल्हा सरचिटणीस,राजेश सावरकर,राज्य प्रसिध्दी प्रमुख,जिल्हा नेते गोकुलदास राऊत,संभाजी रेवाळे,प्रविणा कोल्हे,राज्य' महीला प्रतिनिधी,प्रशांत निमकर,जिल्हा कार्याध्यक्ष,नंदकीशोर पाटील,जिल्हा कोषाध्यक्ष,मनिष काळे,कार्यालयीन सचिव महीला आघाडी प्रमुख सरीता काठोळे,विनिता घुलक्षे,जिल्हा सरचिटणीस,सुषमा वानखडे,जिल्हा कार्याध्यक्ष,भावना ठाकरे,जिल्हा कोषाध्यक्ष,जुनी पेन्शन सेलचे जिल्हा प्रमुख अल्हाद तराळ,जिल्हा प्रमुख,प्रेमसुख ठोंबरे,जिल्हा सरचिटणीस,निलेश कांडलकर,जिल्हा कार्याध्यक्ष,पंकज दहीकर,जिल्हा कोषाध्यक्षम.रा.जुनी पेन्शन संघटनाचे गौरव काळे,म.रा.प्राथमिक शिक्षक संघ(संभाजी थोरात गट)अजय साव,भगत सर,म.रा.उर्दू शिक्षक संघटनाचे जावेद जोहर,शहजाद अहमद,शे.मुजोबोद्दीन,अ.भा.उर्दू शिक्षक संघटनेचे वसीम फरहत,मो.इस्हाक,सै.अहमद अली,शिक्षक सेनेचे रुपेश टाले,राजाभाऊ राजनकर,अनिल कोल्हे,निलेश टोपे,उमाकांत जिरापूरे,विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे दिलिप कडू,चेतवा संघटनेचे संतेन्दु अभ्यंकर,शिक्षक परिषदचे पदाधिकारी शिक्षक यांच्यासह दिनेश साबळे,संगीता तडस उमेश चुनकीकर,सदानंद रेवाळे सह शेकडो शिक्षक,शिक्षिका उपस्थित होते.असे शिक्षक समितीचे प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# फलाटावरील गर्दी टाळण्याचा प्रशासनाचा प्रयत्न


## बडनेरा, अकोला, शेगाव प्लॅटफॉर्म तिकीट विक्री बंद




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

मध्य रेल्वेच्या विविध रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकीट विक्री बंद करण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. त्यामागे विशेष असे कारण असून फलाटांवरील गर्दी टाळण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे आता रेल्वे स्थानकांच्या फलाटांवर जाता येणार नाही का ? असा प्रश्न प्रवाशांमध्ये निर्माण झाला आहे. महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांवर होणारी गर्दी नियंत्रित करण्यासाठी भुसावळ विभागातील काही प्रमुख स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्यात येत आहे. प्लॅटफॉर्मवर होणारी गर्दी नियंत्रित करणे आणि स्थानक परिसरातप्रवाशांची सुरळीत हालचाल सुनिश्चित करणे हा उद्देश आहे. प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवरील निर्बंध ०५ते०६ डिसेंबरपर्यंत आहे. भुसावळ विभागातील नाशिक, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगांव, भुसावळ, मलकापूर, शेगांव, अकोला आणि बडनेरा या स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांची विक्री तात्पुरती प्रतिबंधित असेल. प्रवास सुलभ व्हावा यासाठी ज्येष्ठ नागरिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्या लोकांना या निर्बंधांमधून सूट देण्यात आली आहे. दरम्यान सुरळीत आणि सुरक्षित प्रवास अनुभवण्यासाठी प्रवाशांनी त्यानुसार नियोजन करावे आणि नवीन नियमांचे पालन करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# अटकेतील आरोपींची 'कुंडली' आता अनिवार्य; जेल प्रशासनाला पूर्ण माहिती देणार पोलिससर्व पोलीस ठाण्यांच्या ठाणेदारांना सूचना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यांच्या मार्गदर्शना-खाली २७ नोव्हेंबर रोजी कारागृह प्रशासन आणि कायदा अंमल - बजावणी संस्थांमधील गुप्तचर सामायिकरण समितीच्या बैठकीत एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. मनोज कुमार शर्मा यांनी स्पष्ट सूचना दिल्या की जेव्हा एनडीपीएस प्रकरणांमध्ये अटक केलेले कुख्यात संघटित गुन्हेगार आणि हाय-प्रोफाइल आरोपी न्यायालयीन कोठडी अतर्गत जेलमध्ये रवाना करतात, तेव्हा कारागृह प्रशासनाला त्यांच्या सर्व कारनाम्याची माहिती दिली पाहिजे. यामुळे कारागृह प्रशासनाला आरोपींच्या हिसक आणि स्वभावाची जाणीव होईल. आणि त्यानुसार संबंधित आरोपांवर लक्ष ठेवू शकतील. गुरुवारी, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चौहान यांनी सर्व पोलीस ठाण्याच्या प्रमुखांना पत्राद्वारे माहिती दिली. याव्यतिरिक्त, ग्रामीण पोलीस निरीक्षकांना देखील सूचना देण्यात आल्या आहेत.

**पोलिसांना काय द्यावे लागेल?**

एनडीपीएस प्रकरणांमध्ये सहभागी असलेल्या सर्व कुख्यात आणि संघटित गुन्हेगारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी, त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल माहिती आणि आरोपींची असुरक्षितता आणि गुन्हेगारी प्रवृत्ती यांची माहिती कारागृह प्रशासनाला 'लेखी स्वरूपात देण्यात येईल, जेणेकरून तुरुंग अधिकारी त्यांच्यावर विशेष देखरेख ठेवू शकतील.

**अशा आरोपींना हाताळणे कठीण**

अनेक आरोपी विविध ड्रग्ज गुन्ह्यांसाठी तुरुंगात प्रवेश करतात, त्यानंतर तुरुंग त्यांच्यासाठी व्यसनमुक्ती केंद्रासारखे बनते. अचानक, नशेचे पदार्थ न मिळाल्याने ते कासावीसहोतात. त्यांची तब्येत आणखी बिघडली तर त्यांना रुग्णालयात दाखल करण्याशिवाय दुसरा पर्याय राहत नाही. हा एक अतिशय चांगला निर्णय आहे. यामुळे सुरुवातीपासूनच आरोपींवर देखरेख ठेवता येते.अशी माहिती किर्ती चिंतामणी, तुरुंग अधीक्षक, अमरावती मध्यवर्ती कारागृह यांनी दिली.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत